
चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही

जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505




संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा


नगर ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कं.लि.
Reg No : U01110PN2020PTC194433
सुरक्षित व फायदेशीर गुंतवणूकीचे सुवर्णसंधी...
वेगाने विकसित होणाऱ्या इथेनॉल निर्मिती प्रकल्पात शेअर्स (भागभांडवल) स्वरूपात गुंतवणूक करून वार्षिक व्याज स्वरूपात फिक्स इनकम (हमखास परतावा) व मोठ्या प्रमाणात डिव्हिडंटचा लाभ मिळवा.
रजि.ऑफिस : अकोलकर हॉस्पिटलजवळ, बुरुडगावरोड, अहिल्यानगर, Email ID : nagaragrofpc@gmail.com
Mo : 7020360816, 9307230076



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २८.०४.२०२५ | अंक नं. २४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



फक्त फायदाच फायदा !

खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090




22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



॥ अक्षय तृतीया ॥
MANGO KING Pappu Ahuja
खास अक्षय तृतीयाच्या दिवशी आंब्याचा आस्वाद घेण्यासाठी
पप्पु पमनदास आहुजा मध्ये आवश्य भेट द्या..
रत्नागिरी | देवगड हापूस | म्हैसूर लालबाग | केशर | रत्नागिरी पायरी
सर्व प्रकारचे आंबे मिळण्याची प्रशस्त आढी..
आवश्य भेट देऊन खात्री करा (फळ आढी)
आधुनिक कुरिअर समोर, नवीपेठ, अहिल्यानगर
मो. 9552633955 / 9028248987 / 9890057353




Happy Birthday
आमचे मित्र
कपिलभाऊ मुथा
हॅलो 976644444
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
हॅलो ग्रुप
सर्व मित्र परिवार
अहिल्यानगर, पुणे, नाशिक



अक्षयतृतीयेचा मुहूर्त साजरा करा सुमधुर आंब्यांनी

म्हैसूर लालबाग
हापूस | पायरी
ओरिजनल देवगड
रत्नागिरी हापूस
आंबे योग्य भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
खाबिया बंधू आंबेवाले
फसवे भाव नाही, फसवा माल नाही !!!
हातमपुरा, पावन हनुमान रोड, अहिल्यानगर.
9422228616, 9822777735


## ॥ चतुर्थ पुण्यस्मरण ॥



**संथाराव्रतधारी**

**स्व. श्रीमती सूरजबाई ख़ुशालचंदजी डागा**

स्वर्गवास : 28 एप्रिल 2021

पता नही क्या जादु होता है माँ के पैरो में
हम जितना झुकते है उतना ऊपर उठ जाते है।

सच में हर रिश्ते में मिलावट देखी,
कच्चे रंगो की सजावट देखी
सालो साल देखा है माँ को ,
उसके चेहरे पर ना थकावट देखी
न ममता में कोई मिलावट देखी।

परमात्मा परमेश्वर आपकी आत्माको परम शांति प्रदान करे ।

**भावपूर्ण श्रद्धांजली.**

प्रविणकुमार, संजय - सौ. ममता, दिनेश - सौ. कविता
एवं समस्त डागा परिवार : अहिल्यानगर - पुणे
अभिजीत - अंजली चोरबेले, पुणे : सौ. मीना- दिनेशजी मुनोत, संभाजी नगर
सौ. अविना - प्रितेशजी कटारिया, पुणे

सूरज इन्फो प्रा. लि. : ॲड मेथडस इंडिया प्रा. लि.
असेन्ट कॉन्ट रिसर्च प्रा. लि. : डागा ग्रोथ सोल्युशन्स : ऑरेंज कॉन्ट रिसर्च LLP


MORESHWARA HEIGHTS
वास्तू सौख्याची अक्षय्य सुखाची...
मुहूर्तावर सुखवास्तूची बुकींग करा
आनंदधाम जवळ, भवानी नगर येथे
वास्तू शास्त्रानुसार साकार होत आहे.
3 BHK
LUXURIOUS FLATS
One Floor, One Flat

Your Luxurious Heaven Awaits
Smart Living, Smart Investment

TERRACE LANDSCAPE
MAIN ENTRANCE
CCTV CAMERA
SOLAR PANEL SYSTEM
BIOMETRIC SECURITY
Plan
PROJECT BY
Er. Charudatta Mulay
+91-78754 29889
Site : Plot No 9, Survey No. 26/3/1, Bhavani Nagar, Near Anand Dhaam, Ahilyanagar.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...




### स्टार्टअप – खरी संकल्पना दूरच...

सरकारची बहुसंख्य ध्येयधोरणे अन् संकल्पना चांगल्या असतात. पण अंमलबजावणी बरीच मर्यादित राहते. हे कळतंय पण आपण सर्व वळवून घेत नाही. असलो, अशीच एक सुंदर, रोजगाराभिमुख व उद्योगधंद्यास सहकार्य करू शकणारी संकल्पना म्हणजे 'स्टार्टअप'...

आजच्या समजुतीनुसार अर्थव्यवस्थेला गती देणारा एक माध्यम–सूत्र म्हणजे स्टार्टअप. असे काहीतरी नवं अन् अनोखं की जे खळबळ उडवून देईल, जग बदलण्याचा प्रयत्न करील. समाजाला गरज असणारी पण आजपर्यंत तयार न झालेली (मूर्त) गोष्ट.

सरकार २०१६ पासून स्टार्टअप कार्यक्रम चालवत आहे. आतापर्यंत दीड लाखांहून अधिक स्टार्टअपस् ओळखले गेलेत. १० हजार कोटींची तरतूद असून, त्यातून १६ लाख नोकऱ्यांचा यात दावा आहे.

पण या संकल्पनेच्या खऱ्या अर्थाचे काय? ज्या उद्देशाने आणले, जिथे लक्ष्य असायला हवं होतं तिथेच नाही. चीन वा जपानप्रमाणे ना मोठ्या प्रमाणात ना इलेक्ट्रीक ना बॅटऱ्यांचे सखोल तंत्रज्ञान, ना जनरेटीव्ह एआ आहे ना अभियांत्रिकी, मॅन्यफॅक्चरिंग क्षेत्रात काही.

आपल्याकडे स्टार्टअपच्या नावाखाली काय होतंय तर बहुतांशी डिलीव्हरीचं काम! नवउद्योजकाच्या व संशोधनाच्या संकल्पना तयार करण्याचे वातावरण अगदीच कमी आहे.

गंभीर बाब म्हणजे एखाद्याने खरंच अभ्यासपूर्वक स्टार्टअपसाठी पावलं टाकली तरी तो सरकारी कार्यालये, फायली, बाबूशाही, कमिशन या चक्रव्युहात अडकून पडतो.

थोडक्यात ही गोष्ट आहे झोपलेल्याला जागं करण्याची... की चला, जे स्वप्न बघितलंय ते आता पूर्ण करू या. पण दुर्दैवाने सर्वांनाच सरकारी नोकरी, आरक्षण संरक्षणातच इंटरेस्ट. महासत्ता सहजच होणार नाही. सरकारी, शैक्षणिक, सामाजिक जीवनात चांगल्या कल्पना, संशोधनांना स्टार्टपासून उभारणीस प्रोत्साहन द्यावे लागेल.

**संदर्भ – योगेश मिश्र**

## राजकुमार गुलाटी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – तारकपूर सिंधी कॉलनी येथील रहिवासी राजकुमार होरीलाल गुलाटी (वय ६५) यांचे २६ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, भावजया, पुतणे असा परिवार आहे.

## चंद्रकलाबाई चानोदिया यांचे अल्प आजाराने निधन



नगर – जामखेड येथील रहिवासी श्रीमती चंद्रकला नेमीचंद चानोदिया (वय ७६) यांचे २६ एप्रिल रोजी अल्प आजाराने पुणे हॉस्पिटल येथे निधन झाले. त्यांच्यावर जामखेड अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## उद्योजक सुभाष मुथा यांचे निधन

नगर – नगरमधील उद्योजक सुभाष आलमचंद मुथा (वय ७६) यांचे २७ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा सी.ए.रोहित मुथा, सून, एक विवाहित मुलगी, २ बहिणी, १ भाऊ, पुतणे, डॉ.राकेश मुथा, सी.ए.धिरज मुथा आणि नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत मुथा यांचे ते बंधू तर सी.ए.महेश भळगट यांचे सासरे होते.



सुभाष मुथा यांनी सन १९७२ मध्ये मेट्रॉलॉजीकल इंजिनिअरिंगची पदवी मिळवली होती. नगर एमआयडीसीच्या स्थापनेत महत्वाची भूमिका बजावली. स्क्रॅम इंडस्ट्रिज ॲण्ड स्टील फॅब इंडस्ट्रीजचे डायरेक्टर, एमआयडीसी जिमखानाचे संस्थापक, गौतम निधी अहिल्यानगरचे अध्यक्ष, अहिल्यानगर ओसवाल पंचायत सभेचे माजी विश्वस्त म्हणून त्यांनी योगदान दिले. ते अतिशय सरळ स्वभावी, नेतृत्वगुण संपन्न तसेच एकत्र कुटुंब पध्दतीचे पुरस्कर्ते होते. धार्मिक वृत्तीचे असल्याने त्यांनी स्थानकवासी तसेच मंदिरमार्गी साधूसंतांची नेहमीच सेवा केली. त्यांच्यावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## ताराबाई उदावंत यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील ताराबाई रामभाऊ उदावंत (वय ९२) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सराफ व्यावसायिक संतोष उदावंत व महेश उदावंत यांच्या आजी होत.

## पुष्पाबाई वाघ यांचे अपघाती निधन

श्रीरामपूर – येथील जय मल्हार एग्ज सेंटरच्या संचालिका पुष्पाबाई सुरेश वाघ (वय ६२) यांचे अपघाती निधन झाले.



त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

एस.टी महामंडळाचे कर्मचारी अमोल वाघ व आयसीआयसीआय बँकेचे कर्मचारी अविनाश वाघ यांच्या मातोश्री होत.





पहेलगामच्या घटनेच्या निषेधार्थ सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी सोमवारी भिंगार बंदची हाक देऊन आंदोलन केले. यावेळी पोलीस प्रशासनास प्रकाश लुणिया, संभाजी भिंगारदिवे, सुनील लालबोंद्रे, महेश नामदे, संजय सपकाळ, विष्णू घुले, सचिन जाधव, नामदेव लंगोटे, रवींद्र लालबोंद्रे, संतोष बोबडे, शाम वाघस्कर आदींनी निवेदन दिले. भिंगारच्या सर्व बाजारपेठेतील दुकाने बंद ठेवण्यात आली होती.

# पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून व जाळून पहेलगाम घटनेचा सर्वपक्षियांनी केला 'निषेध'

**भिंगार बंदला प्रतिसाद**

नगर – पाकिस्तानी अतिरेक्यांनी पहेलगाम येथे गोळीबार करून हत्या केलेल्या हिंदू बंधू भगिनींना श्रद्धांजली वाहण्यासाठी भिंगारच्या सर्व पक्षाच्यावतीने सोमवारी सकाळी बंद पुकारण्यात आला होता. या बंदच्या आवाहनाला भिंगार मधील सर्व बाजारपेठेमधील व्यापारी, दुकानदार, छोटे–मोठे व्यावसायिकांनी आपली दुकाने बंद ठेवून प्रतिसाद देत घटनेचा निषेध केला. यावेळी भिंगार वेशीजवळ झालेल्या आंदोलनात सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांनी पाकिस्तान मुर्दाबाद... पाकिस्तान मुर्दाबाद..., भारतमाता की जय...., जय श्रीराम अशा घोषणा दिल्या. तसेच पाकिस्तानचा झेंडा लाखो लोकांच्या पायदळी तुडवला जावा यासाठी भर रस्त्यात चिटकवण्यात आला. तसेच पाकिस्तानचा झेंडा जाळून निषेधही करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक आर. के. दहिफळे यांना सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले.

भिंगार बंद आंदोलनात प्रकाश लुणिया, संभाजी भिंगारदिवे, सुनील लालबोंद्रे, महेश नामदे, संजय सपकाळ, विष्णू घुले, सचिन जाधव, नामदेव लंगोटे, रवींद्र लालबोंद्रे, संतोष बोबडे, शाम वाघस्कर आदींसह सर्व पक्षीय पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रशासनास दिलेल्या निवेदनात नमूद केले होते, भारताचा मुकुटमणी असलेल्या काश्मीरमधील पहेलगाम येथे पाकिस्तानी धर्मांध अतिरेक्यांनी फक्त हिंदू धर्माच्या पर्यटकांनाच धर्म विचारून बेछूट गोळीबार करून त्यांची अमानुषपणे हत्या केली. याचा आम्ही सर्व भिंगारवासीय निषेध करीत आहोत. आमची केंद्र व राज्य सरकारकडे अशी मागणी आहे की आपण या धर्मांध पाकिस्तानी अतिरेक्यांना सहारा व आश्रय देऊन त्यांना पैसे पुरवणाऱ्या देशद्रोही लोकांचा शोध घेऊन त्यांना यमसदनी पाठवावे. शहरातील पाकिस्तानी व बांगलादेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांचीही भारतातून हकालपट्टी करावी. शहरातील ज्या ज्या ठिकाणी सरकारी सेतू कार्यालाये व पुरवठा अधिकारी अशा देशद्रोही नागरिकांना भारतीयत्वचे दाखले देत आहेत त्यांच्यावरही कठोर कारवाई करावी. आपल्या भिंगार पोलीस स्टेशन हद्दीत रोहिंगे, बांगलादेशी घुसखोरांना शोधण्याचे मोहीम त्वरित हाती घ्यावी आणि त्यांना भारताबाहेर ढकलून देण्यात यावे.

आम्ही संपूर्ण भिंगारवासी भारत सरकारच्या संपूर्ण सुरक्षा रक्षकांबरोबर आहोत. या घटनेचा निषेध करण्यासाठी २८ एप्रिल रोजी सकाळी मारुती मंदिर येथे सर्व भिंगारवासी सामूहिक हनुमान चालीसा पाठ करून भिंगार बंदचे आवाहन केले. संध्याकाळी ठीक ७.३० पूर्ण भिंगार शहरातील सर्व नागरिक दोन मिनिटे आपल्या घरातील व दुकानातील लाईट बंद करून एक पणती श्रद्धांजलीसाठी लाऊन काश्मीर येथे मरण पावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करणार आहेत.

यावेळी निलेश साठे, प्रज्योत लुणिया, राजेंद्र फुलारे, बापू लीपणे, नाना मोरे, सुदाम लांडे, लॉरेन स्वामी, रुपेश भंडारी, श्लोक भंडारी, सोमनाथ आव्हाड आदींसह सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा माजी सैनिकांच्या वतीने निषेध

नगर – जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा अखिल भारतीय पुर्व सैनिक सेवा परिषद या माजी सैनिकांच्या संघटनेच्या वतीने निषेध करण्यात आला. बसस्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर यावेळी निदर्शने करण्यात आली.



पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ बसस्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर निदर्शने करताना अखिल भारतीय पुर्व सैनिक सेवा परिषदचे पदाधिकारी व सदस्य. (छाया – बबलू शेख)

यावेळी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत भारत सरकार यांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये म्हंटले आहे की, कश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या पर्यटकांवरील भ्याड हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तींच्या शोकाकुल कुटूंबियांना याद्वारे आम्ही शोकसंवेदना प्रकट करतो. भारत सरकारने दहशतवादी संघटना व त्यांच्या पाठीशी घालत असलेल्या देशाच्या विरोधात कठोर कारवाई करावी. त्यांचा समुळ विनाश करावा. जेणेकरून भविष्यात भारतीय नागरिक व भारतात अशी घृणास्पद कारवाई करण्याची कोणाला हिम्मत होणार नाही. या बाबतीत अखिल भारतीय पुर्व सैनिक सेवा परिषदेच्या वतीने जिल्हा अध्यक्ष भाऊसाहेब वाबळे व सर्व पदाधिकारी, सदस्य यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मोटारसायकल रैली द्वारे कापडबाजार, दिल्ली गेट, सिव्हिल मार्गाने जाऊन जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले. या प्रसंगी अध्यक्ष भाऊसाहेब वाबळे, सचिव राजेश देशपांडे, संघटक सुभाष सुर्यवंशी तसेच आप्पासाहेब कुलट, ज्ञानेश्वर कासार, शशांक देवधर, नारायण घुले, बाळासाहेब वाघ, आप्पासाहेब पानमंद, अरविंद सुद्रीक, दामोदर कळमकर, बेलेकर, चोथवे, श्री. कोलते, राजेंद्र अकोलकर व पूर्व सैनिक सेवा परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# घराबाहेर लावलेली दुचाकी रात्रीच्या वेळी दोघांनी पेटवली

नगर – मित्रांच्या घरच्यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन तुम्ही येथे राहू नका असे म्हणून एकाने शिवीगाळ केली. अन मित्राच्या मदतीने घरासमोर उभी केलेली दुचाकी मोटारसायकल पेटवून दिली. ही घटना २६ एप्रिल रोजीचे रात्री ९.३० ते २७ एप्रिल रोजीच्या पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास आगरकर मळा येथे घडली.

याबाबत ज्योती भारत ठाकुर (वय ३५, रा. आगरकर मळा) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की पिनू दरेकर (रा. आनंदनगर, मल्हार चौक) हा फिर्यादी यांच्या दोन भावांचा लहानपणापासून मित्र असून त्याचे फिर्यादीच्या घरी जाणे येणे आहे. १९ एप्रिल रोजी सकाळी पिनू दरेकर हा फिर्यादीच्या घरी आला. त्यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन तुम्ही येथे राहू नका. तुम्ही येथे राहायच्या लायकीचे नाही. असे म्हणून त्यांना शिवीगाळ केली अन तेथून निघून गेला. त्यानंतर २० एप्रिल रोजी मध्यरात्री फिर्यादी यांच्या गाडीची तोडफोड केली. २६ एप्रिल रोजी रात्री नऊ वाजता पिनू दरेकर व त्याचा मित्र धनंजय बेरड (रा विशाल कॉलनी, आगरकर मळा) आले. अन त्यांनी फिर्यादीच्या आईच्या चारित्र्यावर संशय घेऊन फिर्यादीस व त्यांच्या दोन्ही भावास शिवीगाळ केली. फिर्यादीच्या भावांनी हा वाद त्यांना समजावून सांगून मिटवला त्यानंतर सर्व झोपी गेले. मध्यरात्री ३ वाजण्याच्या सुमारास शेजारच्यांचा आरडाओरडा ऐकून फिर्यादी व त्यांच्या घरचे बाहेर आले असता त्यांना त्यांची सुझुकी कंपनीची ॲक्सेस दुचाकी (क्र.एम एच१६ डी एन ७४०१) मोटारसायकलला आग लागलेली दिसली. आगीत दुचाकी जळून खाक झाली. त्याचवेळी दोघांना तेथून पळताना पाहिले. ते पिनू दरेकर आणि धनंजय बेरड असल्याचे ओळखले. या आगीत फिर्यादीचे ५० हजाराचे नुकसान झाले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पिनू दरेकर आणि धनंजय बेरड या दोघांविरुद्ध बी एन एस २०२३ कलम ३२६ (एफ), ३२४ (४), ३५२.३(५) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलिस हवालदार सोनवणे हे करीत आहेत.

# शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग 'मनपा स्वच्छते'चा पोलखोल

## कचरा थेट महापालिका कार्यालयात आणून टाकणार : तायगा शिंदे



नगर – महापालिकेच्या स्वच्छता अभियानाची केवळ दिखाऊ मोहीम सुरू असून प्रत्यक्षात शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचले आहेत. दररोज घरासमोर येणारी घंटागाडी ८ ते १० दिवस गायब राहते, त्यामुळे नागरिकांना घरातील कचरा साठवून ठेवावा लागतो किंवा नाईलाजाने रस्त्यावर टाकावा लागतो. परिणामी शहरभर दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक तायगा शिंदे यांनी पुढाकार घेत नागरिकांच्या समस्या थेट समजून घेण्याचा निर्णय घेतला आहे. ते म्हणाले की, मी प्रत्येक घरी जाऊन नागरिकांच्या तक्रारी ऐकणार असून कचऱ्याचे फोटो सोशल मीडियावर प्रसारित करून महापालिकेच्या ढिसाळ कारभाराचा पोलखोल करणार आहे. शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा ठेका महापालिकेने २ वर्षांपूर्वी दिला असला तरी प्रत्यक्षात ठरलेल्या अटींप्रमाणे काम होत नाही. घनकचरा संकलनात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला असून महापालिका प्रशासन आणि ठेकेदार यांच्यात संगनमताने भ्रष्टाचार सुरू असल्याचा गंभीर आरोप शिंदे यांनी केला. शहरातील कचरा उचलला जात नसतानाही केवळ कागदोपत्री वजन दाखवले जात आहे, असा दावा त्यांनी केला आहे. या अस्वच्छतेमुळे शहरात साथीचे आजार पसरण्याची शक्यता वाढली आहे. जर प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून दररोज नियमित घंटागाडी चालू केली नाही, तर नागरिकांनी गोळा केलेला कचरा थेट महापालिकेच्या कार्यालयात आणून टाकण्याचा इशारा, तायगा शिंदे यांनी दिला.

## सारसनगर येथे तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

नगर – राहत्या घरातील छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेऊन २० वर्षीय तरुणीने आत्महत्या केल्याची घटना सारसनगर येथील भगवान बाबा मंदिराजवळ २७ एप्रिल रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली.

प्रियंका बबन आंग्रे (रा. भगवान बाबा मंदिराजवळ, सारसनगर) असे मृत तरुणीचे नाव आहे.

प्रियंका हिने राहत्या घरातील छताला असलेल्या लोखंडी अँगलला गळफास घेतल्याची बाब लक्षात येतच तिच्या कुटुंबीयांनी तिला तातडीने औषध उपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. तोडमल यांनी तिला तपासून ती औषधोपचारापूर्वी मयत झाली असल्याचे घोषित केले.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात डॉ. तोडमल यांनी दिलेल्या अहवालावरून आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार महेश विधाते करीत आहे.

# वाहतुकीस अडथळा करणाऱ्या १० जणांवर गुन्हे दाखल

नगर – रस्त्यामध्ये वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे हातगाडी, स्टॉल, चालक तसेच वाहनांवर कारवाईची मोहीम तोफखाना पोलिसांनी सुरु केली आहे. या कारवाईत वाहतुकीस अडथळा करणाऱ्या दहा जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई २७ एप्रिल रोजी भिस्तबाग चौक, टीव्ही सेंटर रोडवर, पाईपलाईन रोड व कुष्ठधाम रोड येथे केली.

या कारवाईत पाईपलाईन रोडवरील भिस्तबाग चौक येथे फळाची गाडी रस्त्याच्या मध्ये लावणारा गफूर बाबू बागवान (वय ५०, रा.पवननगर, पाईपलाईन रोड), सुरेखा गोरख दारकुंडे (वय ५०, रा. पंचवटी नगर, पाईपलाईन रोड), महालक्ष्मी मसाला ताक नावाची गाडी लावणारे राजेंद्र बाबासाहेब हरबा (रा. सातभाई गल्ली, दिल्लीगेट), सिद्धराम मसाला ताक नावाची गाडी लावणारे गणेश संतराम हतघुले (वय ४५, रा. गवळीवाडा, सिव्हिल हॉस्पिटल समोर) तसेच टीव्ही सेंटर रोडवरील समर्थ शाळेसमोर भाजीपाला गाडी लावणारे असलम मेहबूब शेख (वय ३७, रा. कादंबरी नगरी, गावडे मळा) भाजी विक्री करणाऱ्या वैशाली तानाजी कांबळे (रा. मिस्कीन मळा, सावेडी), कुष्ठधाम रोडवरील कुष्ठधाम समोर प्लास्टिकची भांडी विक्री करणारी हातगाडी रस्त्यात लावणारे भास्कर एकनाथ जोशी (वय ३४, रा. पद्मानगर, पाईपलाईन रोड), पाईपलाईन रोडवरील श्रीनाथ कॉम्प्लेक्स समोर दुर्गा वॉच नावाचा बोर्ड रस्त्यात लावल्याने रुपेश नारायण सुप्पारस (वय ३८, रा. पंचवटी नगर, पाईपलाईन रोड), टायर दुकानातील टायर रस्त्याच्या मध्ये ठेवणारे टायर दुकानदार राकेश अगय्या जिंदम (वय ३५, रा. श्रमिक नगर, पाईपलाईन रोड) घड्याळाच्या दुकानाचा फ्लेक्स बोर्ड रस्त्यात लावणाऱ्या रंगनाथ देविदास सदुपटला (वय २४, रा. वाणीनगर, तागडवस्ती) यांच्याविरुद्ध तोफखाना पोलिसांनी कारवाई केली. वरील प्रत्येकावर भा. न्या. सं. २०२३ चे कलम २८५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात आत्महत्येचा प्रयत्न

नगर – सरकारी कार्यालयाकडून मी सांगेन तसे होत नाही. या कारणावरुन ३८ वर्षीय इसमाने अंगावर पेट्रोल सदृश्य पदार्थ टाकून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात २७ एप्रिल रोजी रात्री ११.२० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत पोलीस मुख्यालयातील पोलीस कॉन्स्टेबल अनिल झरेकर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की किसन दादा शिंदे (वय ३८, रा. पाटबंधारे ऑफिस जवळ रस्तापुर रोड, भेंडा, ता. नेवासा) याने सरकारी कार्यालयाकडून मी सांगेल तसे होत नसल्याचे सांगून या कारणावरुन पेट्रोल सदृश्य पदार्थ अंगावर ओतून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल अनिल दरेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन किसन शिंदे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम २२६ प्रमाणे आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार रवींद्र टकले करीत आहे.



# गृहिणी

## आरोग्य

### या भांड्यात प्यावे पाणी

लोक मातीच्या आणि तांब्याच्या भांड्यामध्ये साठवलेले पाणी पितात पण उन्हाळ्यात कोणत्या भांड्यात पाणी पिणे जास्त फायदेशीर आहे? उन्हाळ्यात शरीराला हायड्रेट ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. आयुर्वेदात मातीच्या भांड्यात पाणी ठेवणे सर्वोत्तम मानले जाते. कारण त्यात कोणतेही रसायने नसतात. मातीच्या भांड्यातील पाणी प्यायल्याने शरीराची पीएच पातळी संतुलित राहते आणि पचनसंस्था सुधारते. तर तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्याने हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्य सुधारते. पण उन्हाळ्यात मातीच्या भांड्यातील पाणी पिणे जास्त श्रेयस्कर ठरते तर ज्यांना काही आजार आहे त्यांनी तांब्याच्या भांड्यातील पाणी पिण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

## पाककला

### व्हेज सोया पुलाव

साहित्य : १ गाजर, १ बटाटा, १/२ मेजरींग कप मटार, २ टीस्पून तिखट, १ टीस्पून धने पूड, १ टीस्पून पुलाव मसाला, १ इंच तेजपान, २ टीस्पून लसूण जीरे पेस्ट, १/३ टीस्पून हळद, चवीनुसार मीठ, सांबार

कृती : प्रथम सर्व भाज्या स्वच्छ पाण्याने धुऊन चिरून घ्या. नंतर बासमती तांदूळ स्वच्छ पाण्याने धुऊन ठेवा. नंतर एका भांड्यात गरम पाणी करून सोयाबीन वडी बाफवून घ्यावी. नंतर एका कढईत तेल गरम करून मोहरीची फोडणी करून तेजपान, कढीपत्ता घालून कांदा, लसूण, जीरे पेस्ट, तिखट, मीठ, हळद, धने, पूड, टमाटर घालून परतून घ्या. नंतर सर्व भाज्या धुऊन घेतलेले तांदूळ घालून परतून थोडावेळ झाकून ठेवा. नंतर त्यात गरम पाणी सोयाबीन वडी घालून परतून घ्यावे व नंतर मंद आचेवर होऊ दिले. नंतर सोयाबीन व्हेज पुलाव तयार झाल्यावर सांबार टाकून कढी, मठ्ठा सोबत डीश सर्व्ह करावी.

## वास्तू

### तिजोरीमध्ये ठेवा कापूर

* जर आर्थिक टंचाई किंवा नुकसान टाळायचे असेल तर कापूर तिजोरीत ठेवणे फायदेशीर आहे. यामुळे घरात पैसे येण्याचा मार्ग मोकळा होतो आणि घरात समृद्धी येते.

* तिजोरीत कापूरचा एक छोटासा तुकडा ठेवल्याने केवळ पैशाच्या समस्या सुटत नाहीत तर घरात सुख-शांती येते आणि जीवन समृद्ध होते.

* सकाळ संध्याकाळ कापूराची आरती केल्याने घरातून नकारात्मक शक्ती दूर होते.

* घराच्या मुख्य दरवाज्यावर कापूर ठेवल्याने वाईट शक्ती घरामध्ये प्रवेश करत नाही आणि वातावरणही शुद्ध राहते.

* स्वयंपाकघरात कापूर ठेवल्याने अन्न आणि पैशाची कमरता दूर होते. यामुळे पैसे कमविण्याच्या चांगल्या संधी देखील निर्माण होतात.

## सल्ला

ज्या मुली ठेंगण्या असतात त्या सलवार-कुर्ता घातल्यावर आणखीनच कमी उंचीच्या दिसू लागतात. यासाठी उंची कमी असणाऱ्या मुलींनी स्लिट म्हणजेच कट असणारे ड्रेस घालण्यास प्राधान्य द्यावे. समोरच्या बाजुने मधोमध उभा कट असेल किंवा दोन्ही मांड्यांवर मधोमध उभा कट येत असेल, अशा पद्धतीचे कुर्ते निवडावेत. अनारकलीसारखे खेरदार कुर्ते वापरू नयेत.

## सौंदर्य

प्रत्येकजण त्यांच्या त्वचेची काळजी घेण्यासाठी ॲलोवेरा जेलचा वापर करत आहे. कोरफडीचा जेल त्वचेसाठी खूप फायदेशीर मानला जातो. दररोज रात्री एलोवेरा जेल वापरल्याने त्वचेला अनेक फायदे मिळतात. कोरफडीचे तेल मध आणि नारळाच्या तेलात मिसळून लावल्याने त्वचा चमकदार होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५

**श्रीपरशुराम जयंती, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, कृत्तिका १८।४७, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. आजचा दिवस आपल्या करियरवर विधायक परिणाम घडवू शकतो.

**वृषभ** : वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्याची किंवा एखादे महत्त्वाच्या नवीन प्रोजेक्ट आरंभ करण्यासाठी योग्य वेळ आली आहे.

**मिथुन** : आजचा दिवस विधायक काम ासाठी चांगला आहे. भागीदारीच्या कामांमध्ये सावध राहा. आपल्या कार्यस्थानावर सहकाऱ्यां बरोबर वाद होतील.

**कर्क** : आजचा दिवस छान जाईल. मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल. कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा. वाहने व उपकरणे चोरीस जाण्याची शक्यता.

**सिंह** : एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता. आपण एखाद्या व्यक्तीपासून प्रेरीत व्हाल.

**कन्या** : आरोग्य नरम-गरम राहील. नोकरदार मंडळीनो काळजीपूर्वक काम करा. मुले त्रास देऊ शकतात.

**तूळ** : वाहन खरेदीसाठी उत्तम दिवस आहे. मित्रांपासून आनंद मिळेल. एखाद्या सामाजिक कार्यात योगदान द्याल.

**वृश्चिक** : आजची संध्याकाळ कामाबाबतीतील निर्णय घेण्यास अर्थपूर्ण ठरेल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**धनु** : छोट्या-छोट्या अडचणी सतावतील. कार्य एखाद्यावर विसंबून केल्याने ते तडीस जाणार नाही.

**मकर** : योजनाबद्धरीतीने आपली कामे कराल. प्रेमसंबंधात यश मिळेल. अपत्यांपासून आनंदप्राप्ती होईल.


**कुंभ** : काळजीपूर्वक कार्य करा. पळापळ अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण अंगलट येईल.

**मीन** : पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास लाभेल. आपल्या जोडीदाराबरोबर उत्तम वेळ व्यतीत होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१६५

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१६४ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) मंद; हळू; धिमा; सावकाश ३) पांढरे चकचकीत; संगम रवरी ६) 'नकारात्मक'च्या विरुद्ध ७) सकाळच्या वेळी गवताच्या पात्यावर दिसतात ते बाष्पीभवनापासून तयार झालेले जलबिंदू ८) उष्णतेमुळे त्वचेतून बाहेर पडणारे पाणी ९) एक मराठी आडनाव; प्रसिद्ध दिवंगत गुरुजी १०) ताजा; प्रफुल्लित १४) एक प्रकारची दारू १५) विधवा १८) मेहनत; श्रम १९) घाण; विष्ठा २०) आरूढ झालेला; स्वार २३) पलंग विणण्याची पट्टी २४) अंग मोडून येणे

**उभे शब्द :-** १) 'पार्लमेंट'चे मराठी रूप २) ग्लानी; मरगळ; शीण ३) स्वत:चा नाश ४) एकेक बाब घेऊन ५) टापटीप; साफसूफ; चकपक ११) नाव देण्याचा विधी; बारसे १२) येणे १३) फुलातील गोड रस; मकरंद १६) तळहात किंवा तळपाय १७) गंध; राहणे २१) धागा; तंतू; दोरा २२) मोठा हातोडा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : वेदना हे लक्षण आहे की तुम्ही जिवंत आहात, समस्या हे लक्षण आहे की तुम्ही बलवान आहात, प्रार्थना हे लक्षण आहे की तुम्ही एकटे नाहीत.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### संशोधनात प्राण्यांचा वापर कसा केला जातो?

मानवी शरीरात काय घडते याचे मॉडेल तयार करण्यासाठी वैज्ञानिक संशोधनात प्राण्यांचा वापर केला जातो. कधीकधी संशोधन कुतूहलाने प्रेरित असते, उदाहरणार्थ, मानवी शरीरातील विशिष्ट पेशी किंवा प्रथिने काय करतात हे पाहणे, त्याच्याशी संबंधित कोणत्याही रोगावर उपचार विकसित करण्याचा प्रयत्न न करता. बहुतेक प्राण्यांचे संशोधन विद्यापीठांमध्ये केले जाते, परंतु औषध कंपन्या रुग्णांना देण्यापूर्वी संभाव्य नवीन औषध किती सुरक्षित आहे हे तपासण्यासाठी प्राण्यांचा वापर करतात.

अनेक अभ्यास मानवी शरीरात काय बिघाड होतो ज्यामुळे डिमेंशिया किंवा कर्करोग यांसारखे आजार होतात हे समजून घेण्यावर लक्ष केंद्रित करतात. शास्त्रज्ञ या आजारांसाठी मॉडेल तयार करण्यासाठी प्राण्यांच्या अनुवांशिक सामग्रीमध्ये बदल करू शकतात. उदाहरणार्थ, रोगासाठी जबाबदार असलेल्या जीनची ओळख करून देणे जेणेकरून शास्त्रज्ञ संभाव्य उपचारांची चाचणी घेऊ शकतील.

अनुवांशिक बदलासाठी नवीन तंत्रज्ञान आता उपलब्ध आहे, ज्यामुळे अनुवांशिकरित्या बदललेल्या प्राण्यांचा वापर वाढला आहे (प्रामुख्याने उंदीर, परंतु विशेषतः झेब्राफिश). यामुळे केवळ अनुवांशिकरित्या बदललेल्या संततीच्या प्रजननासाठी वापरल्या जाणाऱ्या प्राण्यांची संख्या वाढली आहे.

संशोधन करणाऱ्या प्राण्यांच्या कल्याणासाठी उच्च दर्जाचे वातावरण खूप महत्वाचे आहे. नियामक संस्था वेगवेगळ्या प्रयोगशाळेतील प्रजातींसाठी काय पुरवले पाहिजे याबद्दल विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे तयार करतात, किमान आवश्यकता मांडतात.

प्रयोगशाळेतील प्राणी ज्या पिंजऱ्यात राहतात ते प्रत्येक प्रजातीसाठी योग्य असले पाहिजेत आणि त्यांच्या गरजा पूर्ण करणारे असावेत, त्यांना पुरेशी जागा द्यावी आणि त्यांना इतर प्राण्यांशी संपर्क साधता यावा. प्राण्यांना नैसर्गिक वर्तन दाखवता आले पाहिजे - त्यांच्याकडे घरटे बनवण्यासाठी निवारा आणि साहित्य, चघळण्यासाठी वस्तू, वेगवेगळी खेळणी, योग्य अन्न, धावण्यासाठी किंवा चढण्यासाठी जागा इत्यादी असावीत. जर या गरजा पूर्ण झाल्या नाहीत तर प्राणी असामान्य वर्तन आणि शारीरिक बदल दर्शवू शकतात, ज्यामुळे त्यांचे कल्याण तर कमी होतेच पण प्राण्यांकडून मिळालेल्या वैज्ञानिक डेटावरही परिणाम होतो.

गेल्या काही वर्षांत प्रयोगशाळांमध्ये प्राण्यांना पुरवल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये बरीच सुधारणा झाली आहे. तथापि, त्यांच्या गरजा आणि त्यांचे कल्याण कशामुळे सुधारते, तसेच प्राण्यांच्या कल्याणाची स्थिती कशी सांगायची याबद्दल अजूनही बरेच काही अज्ञात आहे. अभ्यासाच्या शेवटी, बहुतेक प्राण्यांना मारले जाते आणि प्रयोगाचा भाग म्हणून त्यांच्या ऊती आणि अवयवांचे विश्लेषण केले जाते.

### विश्वासू

एक चिमणी आणि एक कबूतर एके दिवशी गोष्टी बोलत बसली असता, चिमणीने सहज कबूतरास म्हटले, 'अग, ज्या ठिकाणी तुझी पिले पुष्कळ वेळा चोरीस गेली, त्याच ठिकाणी तू पुन्हा घरटे बांधून राहतेस, या तुझ्या वेडेपणास काय म्हणावे बरे?

कबूतर म्हणाले, 'चिमूताई, माझा तसा स्वभावच पडला, त्याला मी तरी काय करू? दुसऱ्याला त्रास द्यावा अशी माझी इच्छा नाही, आणि दुसऱ्याकडून मला त्रास होईल, अशीही कल्पना मला होत नाही.'

तात्पर्य: विश्वासाने विश्वास वाढतो ही गोष्ट खरी, पण दोन्ही पक्ष सारखेच विश्वासू पाहिजेत.



## रहमते दर्शन (भाग - १)

### वे हमारे सब कुछ थे

सन् १९७८ की बात है, मेरे भाई का लड़का बीमार पड़ गया। उसकी हालत बहुत चिंताजनक थी । हम डॉक्टर के पास उसे ले गये। डॉक्टर ने उसे देखकर कहा, इस मुर्दे को यहाँ क्यों ले आये हो? हमें डॉक्टर पर बड़ा क्रोध आया और घबराहट भी हो गई। घरवालों से सलाह की। मेरी माता जी कहने लगी, इसे बंगला साहिब सरोवर में नहला दो, यह ठीक हो जायेगा । हम सब चल पड़े। रास्ते में ख़्याल आया कि क्यूँ न हम उसे महाराज जी के पास ले चलें । बच्चे को कपड़े में लपेटकर मैंने उठा लिया और आश्रम आ गये। महाराज जी बाहर आये और बोले, इसे क्या हो गया है? हमारे उत्तर देने पर वे बोले, चिंता न करो, इसे डॉक्टर गुप्ता (शाहदरे वाले) के पास ले जाओ। यह ठीक हो जायेगा। हम डॉक्टर आर. बी. गुप्ता के पास पहुँचे। डॉ. गुप्ता ने बच्चे को दवाई देने से मना कर दिया। हमने कहा, महाराज जी ने हमें आपके पास भेजा है। फिर डॉ. गुप्ता ने कहा, ठीक है, अगर महाराज जी ने आपको मेरे पास भेजा है, तो मैं दवाई ज़रूर दूँगा । उन्होंने बच्चे को देखा और दवाई दे दी। आज वह बच्चा बड़ा हो गया और अपना व्यापार कर रहा है। यह थी दया महाराज जी की। वे मुर्दों में भी जान डाल देते थे।

सन् १९७७ की बात है मेरा छोटा लडका बड़े ऑपरेशन से पैदा हुआ था। मेरी हालत बिगड़ रही थी। डॉक्टर भी घबरा रहे थे। वे दूसरे ऑपरेशन की तैयारी कर रहे थे कि शायद अन्दर कुछ कमी रह गई है, जो हालत बिगड़ रही है। इतने में हमारे घरवालों ने कहा, आप रुकिये, हमें सलाह कर लेने दो। वे सीधे महाराज जी के पास चले गये। उस समय महाराज जी ट्रेन से बम्बई दौरे पर जाने की तैयारी कर रहे थे। गाड़ी में ज़्यादा समय नहीं था । सुनते ही कहने लगे, मैं अस्पताल ज़रूर आता, परन्तु मेरी गाड़ी का समय हो गया है। आप चिंता न करें, यह प्रसाद ले जाओ और उसके मुँह में डाल दो। वे प्रसाद ले आये और मुझे महाराज जी का प्रसाद दे दिया। प्रसाद लेते ही मेरी हालत में सुधार होने लगा। डॉक्टर हैरान थे और पूछने लगे, इसे क्या दवाई दी है? मेरे परिवार वालों ने कहा, हमने तो केवल अपने गुरु का प्रसाद ही इसे दिया है, और कुछ नहीं ।

एक दिन महाराज जी संगत को दर्शन दे रहे थे। मुझे देखकर बोले, बड़े दिन से आप मिले नहीं, सब ठीक-ठाक है न? इतने में मेरे पिता जी बीच में बोल पड़े। महाराज जी ने कहा, ये आपके बच्चे हैं या मेरे? और हमें बहुत अधिक प्यार किया।

एक बार मेरे लड़के पर एक बड़ा पुलिस केस बन गया। पुलिस उसकी खोज कर रही थी ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### स्वाधिष्ठान चक्र

अगर आप सोचते है मैं अमीर हूं, अमीर हूं, और अगर परिस्थितियां ठीक नहीं हैं तब भी यह चक्र आप को धीरे-धीरे अमीर बना देगा। अगर आप मन में सोचें मैं स्वस्थ हूं स्वस्थ हूं तो यह चक्र आप को स्वस्थ बना देगा। अगर आप सोचें सभी मेरे मित्र हैं तो सारा संसार आप का मित्र बनता जाएगा।

मन से विश्व की सेवा करते रहें तो यह संसार को वैसा ही बना देगा, आप के जीवन में वैसे ही लोग, वैसी ही परिस्थितियां आ जाएगीं जैसा आप ने सोचा था । इसलिए सदैव अच्छा ही सोचना है यह चक्र आप को अच्छा ही बनाता जाएगा।

हर रोज नया पढना है, तब ये चक्र नये नये निर्माण कर देगा। आप वकील, डॉक्टर, इंजीनियर जो भी बनना चाहते हैं यह चक्र आपको वैसा ही बना देता है। बस आप उस पर सोचते रहें।

यह चक्र बुद्धि का निर्माण करता है। आप चाहे कितने अनपढ़ हों, मन में सोचते रहो मैं बुद्धिवान हूं आप वेद व्यास जैसा बन जायेगें । यह चक्र संबंधो का निर्माण करता है। सदा सोचते रहो सब अच्छे हैं, मुझे सभी प्यार करते हैं तो आप जहां भी जाओगे उसको प्यार करने वाले ही मिलेगें।

आप हर पल कुछ न कुछ सोच रहे हैं, आप अगर निर्माण का सोच रहे हैं तो यह चक्र निर्माण कर रहा है, अगर आप बुरी चीजें सोच रहे हैं तो बुरी चीजों का निर्माण कर रहे हैं। इसलिए सदैव निर्माण का ही सोचें। दुनिया में जितनी भी नई खोजें विज्ञान, इंजीनियरिंग, मेडिकल, अध्यात्म और यातायात में हो रही हैं यह सब व्यक्ति में स्थित स्वाधिष्ठान चक्र ही कर रहा है। आप मन में जो सोच रहे हैं, अच्छा चाहे बुरा, यह ऊर्जा चक्र उस का निर्माण कर रहा है। यह भी सच है कि मूल आधार और स्वाधिष्ठान चक्र एक दुसरे से मिले हुए हैं।

असन्तुलन - स्वाधिष्ठान चक्र बैलेंस न होने पर नशा करने का मन करता है, ड्रग्स लेते हैं, एलर्जी और अस्थमा की समस्या होगी। चिन्ता, तनाव, नफरत इस चक्र के असन्तुलन को दर्शाते हैं। अगर जीवन में कोई लक्ष्य नहीं है काम करने को मन नहीं करता तो तुरन्त स्वाधिष्ठान चक्र को ठीक करना चाहिये। प्रजनन अंग, लीवर, किडनी, पेनक्रियाज, एड्रिनल ग्रन्थि, रीढ की हड्डी के मध्य हिस्सा आदि में कोई भी परेशानी है तो समझो स्वाधिष्ठान चक्र जागृत नहीं है।

क्रिस्टल

क्रिस्टल विशेष प्रकार की एनर्जी को स्टोर कर के हमारे शरीर को ट्रांसफर करते हैं। कार्नेलियन (Carnelian Crystal) पीच मून स्टोन (Peach Moonstone), ऑरेंज केलसाइट क्रिस्टल (Orange Calcite Crystal) आदि बहुत महत्वपूर्ण हैं। इन क्रिस्टल्स को प्रयोग करने से पहले क्रिस्टल विशेषज्ञ से राय जरुर कर लें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : 'अहो ऐकलत का?'

नवरा : 'मग दुसरं काही करतो का मी लग्न झाल्यापासून...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आफ्रिकेतील सर्वात लांब नदी कोणती?

- मिसिसिपी नाईल डॅन्यूब

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### स्तनपानाचे महत्त्व

बहुतेक वेळा पोट भरले, की बाळ आपोआपच दूध प्यायचे थांबते. मातेला अनुभवाने यातील क्रिया कळतात. स्तनपान करीत असताना कधीकधी भरपूर जोरात दुग्धस्राव सुरू होतो. अशा वेळेला बाळाला दूध ओढताना ठसका लागण्याची शक्यता असते. त्या वेळेस मातेने स्तनाग्राच्या वर व खाली हाताचे पहिले व मधले बोट ठेवून हलकासा दाब द्यावा, त्यामुळे दूध एकदम सुटत नाही. काही स्त्रिया झोपून स्तनपान करतात. अशा वेळेला बाळाच्या नाक व तोंडावर दाब पडल्याने बाळ गदमरण्याची शक्यता असते. म्हणून शक्यतो झोपून स्तनपान करू नये. स्तनपान करून झाल्यावर स्तनाग्रे कोमट पाण्याने साफ करावीत. स्तनाग्रांना चिरा पडल्या असल्यास त्या ठिकाणी शतधौतघत किंवा खोबरेल तेल लावावे. स्तनपान झाल्यानंतर बाळाला खांद्यावर धरून ढेकर काढावा, म्हणजे बाळ उलटी करणार नाही. साधारणत: बाळाला एक वर्ष तरी स्तनपान करावे. प्रथम चार महिने पूर्ण स्तनपान व नंतर पूरक आहाराबरोबर स्तनपान करावे. काही स्त्रिया स्तनपान केल्याने त्यांचे शरीर बेढब होते व स्तनांचे सौंदर्य कमी होते. असे समजतात. परंतु हा चुकीचा समज आहे. उलट स्तनपान केल्याने स्तनांचे आरोग्य चांगले राहून स्तन सुडौल होतात व आरोग्यही चांगले राहते. **स्तन्यदोष** : बाळाच्या शारीरिक व बौद्धिक अशा सर्वांगीण विकासासाठी आईचे दूध फार महत्त्वाचे असते. पहिले सहा महिने बाळ संपूर्णपणे आईच्या दधावर अवलंबून असते. आईचा आहार-विहार चुकीचा झाल्यास त्याचा पारणाम स्तन्यउत्पत्तीवर होत असतो. शारीरिक अशक्तपणा, हीनपोषण असलेला म्हणजेच शरीराचे कमी पोषण करणारा आहार. अति शारीरिक श्रम, मानसिक अस्थिरपणा, चिता, क्रोध, वात्सल्याचा अभाव, अति शोक अशा कारणांमुळे स्तन्य कमी प्रम ाणात उत्पन्न होऊन स्तन्यदुष्टी होते. चुकीचा आहार घेतल्याने व मानसिक ताणाने रसधातूवर व त्यामुळे रसधातूचा उपधातू असलेल्या स्तन्यावर परिणाम होतो. आजच्या धावपळीच्या काळात स्त्री कौटुंबिक जबाबदारी सांभाळून नोकरीनिमित्त घराबाहेर पडते. अशा वेळेला दोन्हीकडील जबाबदारी पार पाडताना तिची शारीरिक व मानसिक ओढाताण होते. अशी तारेवरची कसरत करताना तिला स्वत:च्या प्रकृतीकडे लक्ष द्यायला वेळही नसतो. त्याचा दुष्परिणाम होऊन स्तन्यउत्पत्ती कमी होते. बालक हे पूर्णतः आईच्या शारीरिक व मानसिक स्थितीवर अवलंबून असते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# दि अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी गणेश परभणे यांची बिनविरोध निवड

### उपाध्यक्षपदी विकास पटवेकर व सुरेश जाधव, सेक्रेटरीपदी श्रीनिवास बोज्ञा, सहसेक्रेटरीपदी अरविंद साठे तर कार्याध्यक्षपदी शिवराम भगत

नगर – दि अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी गणेश परभणे यांची तर उपाध्यक्षपदी विकास पटवेकर व सुरेश जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सेक्रेटरीपदी श्रीनिवास बोज्ञा, तर सह सेक्रेटरीपदी अरविंद साठे व कार्याध्यक्षपदी शिवराम भगत यांची फेरनिवड सर्वानुमते करण्यात आली.



कार्यकारणीच्या झालेल्या मीटिंग मधे सेक्रेटरी श्रीनिवास बोज्ञा यांनी सन २०२४-२ ५ चे जमा खर्चाचा हिशोब वाचून दाखविला त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. या वेळी अध्यक्ष गजेंद्र राशीनकर यांनी त्यांच्या खाजगी अडचणी मुळे अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला तो सर्वानुमते मंजूर केला व रिक्त झालेल्या जागी गणेश परभणे यांची अध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली

गणेश परभणे व विकास पटवेकर यांचा सदस्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. असो. चे सह सचिव अरविंद साठे यांनी आभार मानले.

या वेळी असो. चे कार्यकारिणी सदस्य अनिल टकले, अमोल तोडकर, राजू छल्लानी, संजय जंजाळे, अमोल तोडकर, उमेश क्षीरसागर, मयूर भापकर, सागर जाधव, पप्पू जाधव, उबेद खान, संजय बोरा, गोरख खंदारे, अशोक कर्डीले, दाजी गारकर, रमेश बनकर व संजय सुराणा आदि उपस्थित होते.

# मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी गोविंद मनियार यांची निवड

### व्हा.चेअरमनपदी सौ. प्रिया फिरोदिया

नगर – अहमदनगर मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अ.नगर या संस्थेच्या संचालक मंडळाची बैठक झाली. या सन २०२५ – २०२६ ते २०२६-२०२७ या सालाकरीता बिनविरोध निवडणूक झाल्याचे प्राधिकृत अधिकारी व्ही. पी. आळकुटे यांनी घोषित केले.

प्राधिकृत अधिकारी व्ही.पी. आळकुटे यांच्या अध्यक्षतेखाली सी. ए. गोविंद गोपाळ मनियार यांची चेअरमनपदी निवड करण्यात आली. तर सौ. प्रिया नरेश फिरोदिया यांची व्हा.चेअरमनपदी निवड करण्यात आली.



चेअरमनपदी सी.ए. गोविंद गोपाळ मनियार यांचे नाव परेश जगन्नाथ बजाज यांनी सुचविले तर अनुमोदन सी.ए. किरण मनियार यांनी दिले तसेच व्हा.चेअरमनपदी सौ. प्रिया नरेश फिरोदिया यांचे नाव अशोक शांतिलाल भंडारी यांनी सुचविले तर सी.ए. किरण मनियार यांनी अनुमोदन दिले.

प्राधिकृत अधिकारी व्ही. पी. आळकुटे यांचा सत्कार सी.ए. गोविंद गोपाळ मनियार यांनी केला.तसेच नुतन चेअरमन सी. ए. गोविंद गोपाळ मनियार यांचा सत्कार सी. ए. किरण मनियार यांनी व व्हा.चेअरमन सौ.प्रिया नरेश फिरोदिया यांचा सत्कार अशोक शांतिलाल भंडारी यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच संस्थेचे माजी चेअरमन राजेश गुगळे यांचा सत्कार परेश जगन्नाथ बजाज यांनी केला.



अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने प्रार्थना करण्यात आली.

# अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयातर्फे प्रार्थना

### सामूहिक ध्यान करुन ईश्वरी शक्तीला साकडे

नगर – माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने विशेष प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या दिर्घायुष्यासाठी साधकांनी सामूहिक ध्यान साधून ईश्वरी शक्तीला साकडे घातले.

ही प्रार्थना सावेडी रोडवरील महावीरनगर येथील मुख्य केंद्रात आयोजित करण्यात आली होती. राजयोगिनी राजेश्वरी दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात ब्रह्मकुमारी सुप्रभा दीदी, ॲड. निर्मला चौधरी, संगिता देडगावकर, सिताराम भाई, व्यंकटेश भाई, दीपक भाई, आदिनाथ भाई, ॲड. सुमेध चौधरी यांच्यासह साधक सहभागी झाले होते.

राजेश्वरी दीदी म्हणाल्या की, अरुणकाका हे केवळ राजकीय क्षेत्रातील नेते नसून, धार्मिक व सामाजिक कार्याशीही त्यांनी आपली नाळ जोडलेली आहे. आमच्या ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या या मुख्य केंद्राचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले होते. त्यामुळे काका आमच्या कुटुंबाचा एक अविभाज्य घटक आहेत. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी प्रार्थना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रार्थनेदरम्यान सामूहिकरित्या योग व ध्यान साधून काकांच्या स्वास्थ्यासाठी ईश्वरी शक्तीला प्रार्थना करण्यात आली. ॲड. निर्मला चौधरी यांनी दररोज ध्यान केंद्रात अरुणकाकांच्या स्वास्थ्यासाठी विशेष ध्यान साधना करण्यात येणार आहे. त्यांची प्रकृती लवकर पूर्ववत व्हावी, यासाठी संपूर्ण साधक परिवार सातत्याने प्रार्थना करणार असल्याची माहिती दिली.

# फुले चित्रपट टॅक्स फ्री करून लाडक्या बहिणींना मोफत दाखवावा

### फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपट महिलांना देणार प्रेरणा : प्रकाश थोरात

नगर – देशात सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडविणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित फुले हा चित्रपट स्त्रियांना नवी प्रेरणा देणारा ठरणार आहे. हा चित्रपट सरकारने टॅक्स फ्री करावा व देशभरातील लाडक्या बहिणींना मोफत दाखवावा, अशी मागणी पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात यांनी केली आहे.





प्रकाश थोरात म्हणाले की, जगातील दुःख स्त्री-पुरुष विषमतेतून निर्माण झाले आहे. ही विषमता दूर करण्यासाठी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य झोकून दिले. दीडशे वर्षांपूर्वीच त्यांनी स्त्री व दलितांच्या शिक्षणासाठी संघर्ष करून सामाजिक न्यायाचा पाया घातला.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी देशात पहिल्यांदा मुलींसाठी शाळा सुरू केल्या आणि वाचनालयांचे जाळे उभारले. १८५४ मध्ये त्यांनी देशातील साक्षरता अभियानाची सुरुवात केली. विधवांच्या संगोपनासाठी १८६३ मध्ये स्वतःच्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. त्याचबरोबर सत्यशोधक समाजाची स्थापना करून हुंड्याशिवाय विवाहाची प्रथा रूढ केली. अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला करून जातिभेदाच्या विरोधात पहिले पाऊल उचलले. त्यांनी बालविवाह विरोधात आवाज उठवला आणि विधवांच्या पुनर्विवाहाला प्रतिष्ठा दिली. स्वतः च्या मुलाचा आंतरजातीय विवाह घडवून आणत जाती निर्मूलनाच्या चळवळीला स्वतःच्या घरातून सुरुवात केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची प्रेरणा आजच्या महिलांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या कार्याची गाथा फुले या चित्रपटात मांडली असून, तो प्रत्येक घरापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे, असे प्रकाश थोरात यांनी सांगितले. या चित्रपटातून आजच्या महिलांना प्रेरणा व आत्मविश्वास वाढवणारी दिशा मिळेल आणि समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला नवे बळ मिळेल, असेही ते म्हणाले.

# रशियन, ऑस्ट्रेलियन आणि नासाच्या उपक्रमांमध्ये डॉ.दत्ता विघावे यांचा सन्मान

नगर – डॉ. दत्ता विघावे आता थेट आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्थांच्या नजरेत भरले आहेत. रशियन स्पेस एजन्सी 'जिओस्कॅन', ऑस्ट्रेलियन 'ग्रिफिथ युनिव्हर्सिटी' आणि अमेरिकेच्या 'नासा' या तीन संस्थांकडून त्यांना अनुक्रमे २०२५ मध्ये विविध योजनांमध्ये सहभागी करून घेण्यात येत आहे. 'जिओस्कॅन'च्या 'अल्फेरोव्ह २३९' या उपग्रहातून निवडक जागतिक प्रतिभावंतांच्या नावासह डॉ. विघावे यांचे परिचय व छायाचित्र अंतराळात झेपावणार आहे. त्याचप्रमाणे, ऑस्ट्रेलियन 'मिशन प्लॅटिपस-२०२५' अंतर्गत 'क्यूबसॅट' उपग्रहामध्येही त्यांचा परिचय जागतिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी समाविष्ट होणार आहे.



नासाच्या ४ ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या 'इंटरनॅशनल ऑब्झर्व्ह द मून नाईट' कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी डॉ. विघावे यांना खास आमंत्रण देण्यात आले असून त्यांना अधिकृत सहभाग प्रमाणपत्रही देण्यात आले आहे.

शिक्षक, क्रिकेट पंच, प्रशिक्षक, पर्यावरणप्रेमी, लेखक अशा विविध भूमिका निभावणाऱ्या डॉ. विघावे यांनी आतापर्यंत पाच विश्वविक्रम प्रस्थापित केले असून सहाव्याच्या प्रतीक्षेत आहेत. कोरोना काळात केलेल्या सेवाकार्यातून ते विशेष प्रेरणादायी ठरले. तसेच 'वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड'ची संकल्पनाही त्यांनी मांडली आहे. भारत सरकारचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार', 'ग्लोबल पीस अवॉर्ड', अमेरिकन विद्यापीठाची मानद डॉक्टरेट, यु.एन. च्या टॅलेंट पूल सदस्यत्वासह अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गौरव त्यांनी मिळवले आहेत. 'संपूर्ण जग हेच आपले कुटुंब' या तत्त्वाने प्रेरित होऊन डॉ. विघावे सामाजिक परिवर्तनासाठी झटत आहेत.

# महिलांच्या पुढाकाराने केडगाव येथील हनुमाननगर परिसरात श्रीमद् भागवत कथा व शिवलीलामृत पारायण सोहळा उत्साहात

### भक्तिभावाने नटलेल्या सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता

नगर – केडगाव येथील हनुमाननगर परिसरात विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या प्रांगणात ७ दिवस चाललेल्या श्रीमद् भागवत कथा व शिवलीलामृत ग्रंथ पारायण सोहळ्याची सांगता २७ एप्रिल रोजी उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाली. या सप्ताहाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे परिसरातील महिलांनी पुढाकार घेऊन संपूर्ण सोहळ्याचे आयोजन व नियोजन केले होते.

हा धार्मिक सोहळा सलग तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आला. सप्ताहात दररोज काकड आरती, ग्रंथ वाचन, हरिपाठ व श्रीमद् भागवत कथा आयोजित करण्यात आली होती. संपूर्ण परिसर भक्तिभावाने न्हालेला होता.



केडगाव येथील हनुमाननगर परिसरात विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या प्रांगणात ७ दिवस चाललेल्या श्रीमद् भागवत कथा व शिवलीलामृत ग्रंथ पारायण सोहळ्याची सांगता भक्तिमय वातावरणात झाली.

या धार्मिक कार्यक्रमाची सांगता ह.भ.प. बालयोगी ब्रह्ममूर्ती बाबाजी महाराज चाळक यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. बाबाजी महाराजांनी राम व कृष्ण चरित्रातील साम्य व वैशिष्ट्ये प्रभावीपणे उलगडून दाखवली. विशेषत: तरुण-तरुणींना जीवनातील संस्कारांचे महत्त्व पटवून देताना त्यांनी आजच्या काळातील दुष्ट शक्तींचा नाश करण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा उपस्थितांनी निषेधही व्यक्त केला.

या धार्मिक सप्ताहात ह.भ.प. केशव महाराज बाबर देऊळगावकर यांच्या प्रभावी वाणीने भाविक मंत्रमुग्ध झाले. कथेमध्ये अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून कृष्णचरित्रातील क्रांतीकारक बाजू उलगडण्यात आली. काल्याच्या किर्तनानंतर दहीहंडी फोडून सप्ताहाची सांगता करण्यात आली. बाबाजी महाराज चाळक यांचा परिसरातील सर्व महिलांच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी इंदुबाई कदम, सुनीता पवार, निर्मला इंगळे, भक्ती पवार, सरिता भगत, रोहिणी बनकर, शितल नाडे, ॲड. निलीमा मुसळे, नंदा नामदास आदी महिलांनी नियोजनाची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमासाठी विजय भालसिंग, ॲड. गोरख मुसळे उपस्थित होते.

या सप्ताहात ह.भ.प. गणेश महाराज गोंडे, विष्णु महाराज घुणे, दत्तात्रय महाराज तापकीर, उमेश महाराज माळी, दिलीप महाराज खळतकर, माऊली महाराज सौताडे यांनी संगीताच्या साथीसह वातावरण अधिक रंगतदार केले. शेवटी महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला. संपूर्ण सप्ताह सोहळा हनुमाननगर येथील शिवभक्त युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या परिश्रमाने यशस्वीपणे पार पडला.



अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी याकरिता आनंदनगरमधील नागरिकांनी एकत्र येऊन महाआरती करत विठ्ठल चरणी साकडे घातले.

# अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी गुलमोहोर रोड, विठ्ठल रुक्मिणी मंदिरात महाआरती

नगर – माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी गुलमोहर रोडवरील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महाआरती करत काकांच्या आरोग्यासाठी आनंदनगरमधील नागरिकांनी एकत्र येऊन मनोभावे प्रार्थना केली.

काका हे आनंद विद्यालयाच्या स्थापनेमागील प्रमुख आधारस्तंभ राहिले आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि प्रयत्नांमुळे आज असंख्य विद्यार्थ्यांना शिक्षणाचा प्रकाश मिळत आहे. तसेच आनंदनगरमधील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर उभारणीचे स्वप्न त्यांनी साकारले असे श्रीकांत अष्टेकर यांनी सांगितले.

या मंदिरातील विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींची प्राणप्रतिष्ठा त्यांचे वडील कै. बलभीम अण्णा जगताप यांच्या हस्ते झाली होती, ही बाब आजही नागरिकांच्या स्मरणात ताजी आहे. या महाआरतीला राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संगीता खरमाळे, सुनंदा अष्टेकर, रमेश बेरड, इंजि. केतन क्षीरसागर, विजय मराठे, प्रशांत शेटे, शरद झंवर, मकरंद कुलकर्णी, घनशाम शर्मा, सागर अष्टेकर, संजय सोले उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन काकांच्या लवकरात लवकर पूर्ण आरोग्य लाभासाठी विठ्ठल चरणी साकडे घातले.



शिष्यवृत्ती परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत छावनी परिषदेचे मनोनीत सदस्य वसंत राठोड, मुख्याध्यापक संजय शिंदे, मार्गदर्शक शिक्षक सुभाष भारूड, सीमा चोभे, एस.जे.लबडे व स्नेहल लवांडे आदी.

# छावनी परिषद शाळेचे शिष्यवृत्ती परिक्षेत यश

नगर – महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद आयोजित इयत्ता ५ वी व ८ वीच्या शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल नुकताच लागला असून छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळेने यश मिळवले आहे. शाळेचे एकूण ८ विद्यार्थी या परिक्षेत पात्र झाले आहेत.

पात्र झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रसाद अशोक शेलार २४४ गुण, स्नेहल काळू हिले २०४ गुण, नन्नवरे कल्याणी निशांत १६८ गुण, नन्नवरे ईश्वरी रवि १५८ गुण, श्रावणी संदिप साबळे १५० गुण, गोरखे अभिमन्यु १५० गुण, कुरूमकर सार्थक सचिन १४२ गुण तसेच इयत्ता ८ वीच्या क्रांति सचिन मोरे हिने १५४ गुण प्राप्त केले आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार छावनी परिषदेचे मनोनित सदस्य वसंत राठोड यांच्या हस्ते शाळेत झाला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे छावनी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, छावनी परिषदेचे मनोनीत सदस्य वसंत राठोड, शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे, मुख्याध्यापक संजय शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांना सुभाष भारूड, सिमा चोभे, एस.जे.लबडे व स्नेहल लवांडे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर २९ एप्रिलला राहाता येथे घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा

शिर्डी – आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळा (सन २०२६-२८) दरम्यान शिर्डी व शनि शिंगणापूर येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांचे आगमन अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील स्वच्छतेविषयी आवश्यक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी राहाता पंचायत समितीच्या सभागृहात २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत संगमनेर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे सादरीकरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन करणार आहेत. कुंभमेळ्याच्या काळात शिर्डी व शनि शिंगणापूर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याचे उद्दिष्ट या कार्यशाळेमध्ये आहे.


कार्यशाळेस शिर्डी लगतच्या ग्रामपंचायतीतील सरपंच, सदस्य, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, पोलीस पाटील, स्वस्त धान्य दुकानदार, कचरा संकलन करणारे कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, ग्रामसेवक व तलाठी तसेच राहाता पंचायत समिती कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनीही कार्यशाळेस उपस्थित राहावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिले आहेत.



ब्रिगेडियर रसेल डिसूजा यांचा 'स्नेहबंध'च्या वतीने सन्मान करताना डॉ. उद्धव शिंदे. समवेत मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे.







# जम्मू काश्मीरमध्ये अडकलेल्या नागरिकांना घरवापसीसाठी तिप्पट पैसे मोजावे लागले

### घर वापसीसाठी शासनाने मोफत सेवा द्यावी; पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याचा तृतीयपंथी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध


जम्मू काश्मीरमध्ये अडकलेल्या नागरिकांना घर वापसीसाठी शासनाने मोफत सेवा द्यावी याबाबत प्र.निवासी जिल्हाधिकारी अरुण उंडे यांना निवेदन देताना काजल गुरू आदी.

नगर – काश्मीर खोऱ्यातील पहेलगाम जवळील बायसरण परिसरात झालेल्या अमानवी व भ्याड दहशतवादी हल्ल्याचा तृतीयपंथी समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला व या हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शन करून प्र. निवासी जिल्हाधिकारी अरुण उंडे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी तृतीयपंथी समाजाचे अध्यक्ष काजल गुरु समवेत लैला गुरु, सना, गौरी, फिजा, दिया, मीनाक्षी, मोहिनी, अदा, शिवण्या, रिजवाना, सुलताना, मीरा, आयत, रोशनी, तेजू, मनू, मीना, संध्या गुरु, मोहनी, साधना, शुभांगी, आकांक्षा आदीसह तृतीयपंथी समाज उपस्थित होता.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, जम्मू काश्मीर पहेलगाम येथे फिरण्यासाठी गेलेले नागरिक हे महाराष्ट्र व विविध राज्यातून आले होते मात्र दहशतवादी हल्ल्यानंतर तेथे अडकून पडले व त्यांना घर वापसीसाठी काही विमान कंपन्यांकडून ४० ते ५० हजार रुपये तिकिटासाठी घेतले. हे तिप्पट पैसे वसूल करण्यात आले ही दुर्दैवी बाब असून ही दुसरी लूट आहे. या लुटारू विमान कंपन्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व याच्याहून पुढे शासनाने मोफत सुविधा देण्यात यावी. तसेच या संपूर्ण मनमानी तिकीट दर वाढीला निर्बंध लावण्यात यावे या मागणीसाठी व दहशतवादी हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणाबाजी करण्यात आली.

पुढे काजल गुरु म्हणाले की, आम्ही जम्मू काश्मीर येथे सहा तृतीयपंथी अडकून पडलो त्यानंतर आमदार संग्राम जगताप यांच्याशी संपर्क साधून यांनी मदत केली व जम्मू काश्मीर येथे गिरीश महाजन यांनी भेट घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यातून आम्ही परतलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच विविध राज्यातून आलेले पर्यटक यांना तिप्पट मनमानी तिकीट दर घेतले. याकडे देखील शासनाने लक्ष घालावे कारण सर्वसामान्य कुटुंबाला इतका खर्च परवडणारा नसून शासनाने मोफत सेवा दिली पाहिजे होती अशी भावना व्यक्त केली.


पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा शहरातील सकल माळी समाजाच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला.

## पहलगाम हल्ल्याचा सकल माळी समाजाकडून निषेध

नगर – पहलगाम येथे पर्यटनासाठी गेलेल्या निष्पाप नागरिकांना पाकिस्तानी दहशतवाद्यांनी अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या केली. धर्माच्या नावाखाली पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेले कृत्य माणुसकीला काळीमा फासणारे आहे. अशा भ्याड हल्ल्याचा सकल माळी समाजाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे. केंद्र सरकारने अशा प्रवृत्तींना उखडून टाकण्यासाठी कठोर पावले उचलावीत. बायसरन मध्ये घडलेली घटना ही निंदनीय व माणुसकीला काळीमा फासणारी आहे, असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी केले आहे.

काश्मीर खोऱ्यातील पहलगाम जवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा शहरातील सकल माळी समाजाच्या वतीने तीव्र निषेध नोंदविण्यात आला. या घटनेत बळी पडलेल्या निष्पाप २६ नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. माळीवाडा येथील प्रेमराज गुगळे हायस्कूलमध्ये सकल माळी समाज ट्रस्ट च्या माळी वधूवर कार्यालयात श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, कोअर कमिटी सदस्य अमोल भांबरकर, माळी वधू वर कार्यालयाचे अध्यक्ष अशोक हिंगे, उपाध्यक्ष भास्कर चौधरी, सुदाम बोरुडे, राजाराम चिपाडे, रमेश चिपाडे, अर्जुन बोरुडे, संजय ताजणे, लवेश गोंधळे, ताराचंद आंबेकर, विष्णू कानडे, अशोक बोरुडे, आदिनाथ चौरे, अशोक विधाटे, दत्तात्रय शिंदे आदी उपस्थित होते.

# जम्मू काश्मीर येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्याचा अभाविप अहिल्यानगर महानगरशाखेतर्फे निषेध

नगर – अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अहिल्यानगर महानगरकडून पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा दिल्लीगेट येथे निदर्शने करून निषेध करण्यात आला. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम, जिस कश्मीर को खून से सिचा वो कश्मीर हमारा है. अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

जम्मू काश्मीर येथील पहेलगाम या ठिकाणी देशातील विविध भागातून आलेल्या पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून त्यांच्यावर निर्घृणपणे गोळीबार करून हत्या करण्यात आली. इस्लामिक दहशतवाद्यांच्या माध्यमातून भारतातील हिंदूंच्या हत्या करणे हे या देशातील नागरिक कदापि सहन करणार नाहीत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद केंद्र सरकारकडे मागणी करती की या आतंकवादी संघटना त्या पाकिस्तान पुरस्कृत असून या पाकिस्तानी दहशतवादाला त्यांच्या शब्दात उत्तर देणे गरजेचे आहे. ज्या पद्धतीने सर्जिकल स्ट्राइक आणि एअर स्ट्राइक करून केंद्र सरकारने मागील दहशतवादाला उत्तर दिले होते. तशाच पद्धतीने चोख प्रत्युत्तर केंद्र सरकारने द्यावी अशी मागणी अभाविप महानगर मंत्री आनंद गांधी यांनी केली.

यावेळी जिल्हा सहसंयोजक यश मुथ्था, महानगर सहमंत्री अनुष्का निंबाळकर, मध्य नगर मंत्री रोहन भुजबळ, सावेडी नगर मंत्री निधी नारंग, आधी कार्यकर्ते उपस्थित होते.


जम्मू काश्मीर येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्याचा अभाविप अहिल्यानगर महानगर शाखेच्या वतीने निषेध करण्यात आला.


पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या विरोधात जमाते इस्लामी हिंद आणि कासिमखानी मशिदीतील मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन शांततेच्या मार्गाने आंदोलन करत तीव्र निषेध करून मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. (छाया – समीर मन्यार)

## पहलगाम हल्ल्याच्या मुस्लिम समाजाकडून निषेध

नगर – पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ एकत्र येऊन जमाते इस्लामी हिंद आणि कासिमखानी मशिदीतील मुस्लिम बांधवांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन करून तीव्र निषेध करत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात केली.

या प्रसंगी डॉ. इकराम खान म्हणाले की, दहशतवादाला कोणताही धर्म नसतो आणि अशा अमानवीय कृत्यांच्या मागे असलेले लोक मानवतेचे खरे शत्रू आहेत. दहशतवाद आणि मानवतेला हानी पोहोचवणाऱ्या प्रत्येक कृत्याचा आम्ही तीव्र निषेध करतो.

इंजीनियर मोहम्मद अख्तर यांनी ही स्पष्ट केले की, देशात द्वेष पसरवण्याचे जे प्रयत्न सुरु आहेत, त्याचा मुस्लिम समाज खंबीरपणे विरोध करेल आणि देशातील बंधुता व एकतेस बळकट करेल.

याप्रसंगी जमाते इस्लामी हिंद, अ.नगर चे सर्व सदस्य तसेच लहान मुलांपासून तरुणाई आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटांतील मुस्लिम बांधव सहभागी झाले होते, समाजाच्या प्रत्येक थरातून या अमानुष कृत्याच्या विरोधात एकसंघ आवाज उठवला गेला. आंदोलकांनी हातात फलक व बॅनर घेऊन दहशतवादाच्या विरोधात खडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करत शांतता आणि सौहार्द जपण्याचे आवाहन केले. यावेळी देशात अमन आणि बंधुतेसाठी दुवा करण्यात आली.

# ईस्ट इंडिया फर्टिलिटी कॉन्व्हक्लेव २०२५ मध्ये नगरमधील डॉ. हृषीकेश पंडित यांचा सहभाग

### गुंतागुंतीची लेप्रोस्कोपिक ट्युबोप्लास्टी शस्त्रक्रियेचे यशस्वी सादरीकरण


पश्चिम बंगालमधील कोलकता येथील नामांकित आयएलएस हॉस्पिटलमध्ये नुकतीच ईस्ट इंडिया फर्टिलिटी कॉनक्लेव्ह २०२५ ही वैद्यकीय कॉन्फरन्स पार पडली.

नगर – पश्चिम बंगालमधील कोलकता येथील नामांकित आयएलएस हॉस्पिटलमध्ये नुकतीच ईस्ट इंडिया फर्टिलिटी कॉनक्लेव्ह २०२५ ही वैद्यकीय कॉन्फरन्स पार पडली. यामध्ये अहिल्यानगर येथील डॉ.हृषीकेश पंडित यांनी सहभाग घेवून लॅप्रोस्कोपीव्दारे अतिशय गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. कॉन्फरन्समध्ये फर्टिलिटी एनहान्सिंग एंडोस्कोपिक सर्जरी कार्यशाळा झाली. यात डॉ. पंडित यांनी एक अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीची लेप्रोस्कोपिक ट्युबोप्लास्टी शस्त्रक्रिया यशस्वीपणे सादर केली.

संबंधित रूग्णाची पूर्वी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाली होती. आता पुन्हा गर्भधारणा होण्यासाठी ट्युबचे रिव्हर्सल आवश्यक असल्याने लेप्रोस्कोपिक ट्युबोप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया अनेक कारणांमुळे आव्हानात्मक होती. डॉ.पंडित यांनी हे आव्हान स्विकारून आपला अनुभव, कौशल्य वापरुन शस्त्रक्रिया अतिशय कुशलतेने व अचूक पार पाडली. यावेळी उपस्थित डॉक्टरांनी त्यांचे कौतुक केले. परिषदेत या शस्त्रक्रियेचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. देशभरातील स्त्रीरोगतज्ज्ञ, एंडोस्कोपिक सर्जन यावेळी उपस्थित होते. डॉ.अमत बसू, डॉ.पुषन कुंडु, डॉ.अभिनीबेश चॅटर्जी, डॉ.अरूण टांटिया, डॉ.रूची पिपारा अशा अनेक डॉक्टरांनी डॉ.पंडित यांचे कौतुक केले.

डॉ.हृषीकेश पंडित हे भिंगार येथील पंडित हॉस्पिटलचे संचालक असून इंडियन असोसिएशन ऑफ गायनेकॉजीस्ट एडोस्कोपिस्टस संघटनेचे मॅनेजिंग कमिटी सदस्य आहेत. ते नगरमधील पहिले ३ डी लेप्रोस्कोपी सेंटर पंडित हॉस्पिटलचे संस्थापक आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक जटील व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत.

## बलत्काराच्या आरोपातून तरूणाची निर्दोष मुक्तता

नगर – सावेडी, शिलाविहार येथे २९.०८.२०१९ रोजी यातील फिर्यादी तरूणी हि पाईपलाईन रोडने भिस्तवाग चौकातून जात असताना आरोपी मौजुद्दीन उर्फ मोसिन शफियोद्दीन (वय ३३, रा. शांतीविहार अपार्टमेन्ट, गुलमोहर रोड याने त्याचे ताब्यातील मोपेड मोटारसायकल फिर्यादी तरूणीचे मोटारसायकलला आडवी लावुन फिर्यादीस आडवुन आरोपी याने त्याचे मोवाईल मधील फिर्यादी हिचे असलेले फोटो नातेवाईकांना व्हायरल करण्याची धमकी देवुन वळजवरीने फिर्यादीस सोबत येण्यास भाग पाडले व शिलाविहार येथील शांतीविहार अपार्टमेन्ट येथे घेवुन जावुन फिर्यादीचे इच्छे विरूध्द बळजबरीने बलात्कार केला म्हणुन फिर्यादी तरूणीचे फिर्यादीहून वरील आरोपीचे विरूध्द तोफखाना पोलीसांनी भा.द.वि. कलम ३७६, ३६३, ३४१, ५०६, अन्वये गुन्हा दाखल केला असता त्याची चौकशी नुकतीच येथील जिल्हा न्यायालयात होवुन त्यात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपी तर्फे ॲड. सतिशचंद्र व्ही. सुद्रिक यांनी काम पाहिले.


**पहलगाम येथील भ्याड हल्ल्याचा निंबळकमध्ये निषेध...** जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथील बैसरन खोऱ्यात दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ निरपराध पर्यटकांनी जिव गमावला तसेच अनेक पर्यटक गंभीर जखमी झाले. या हल्ल्याचा नगर तालुक्यातील निंबळक मध्ये दत्त मंदिर चौक येथे जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी नगर पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार, ॲड. राहुल ठाणगे, ज्योतिषशास्त्र अभ्यासक संतोष घोलप, ह.भ.प. बाळकृष्ण महाराज खेसे, चांद पटेल, मारूती गायकवाड, अनिल कळसे, सुभाष कोरडे, नाना कोतकर, दादासाहेब खपके, दादा झावरे, संजय रोहकले, रामदास कोतकर आदी उपस्थित होते. (छाया – संदीप बांगर)



**पहेलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा अहिल्यानगर टुरिझम फोरमतर्फे निषेध**

पहेलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा अहिल्यानगर टुरिझम फोरमतर्फे निषेध करण्यात आला तसेच मृत्युमुखी पावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी संस्थापक किशोर मरकड, अध्यक्ष निलेश वैकर, सचिव सागर सहानी, शामराव शिरसागर, सचिन मस्के, प्रसाद मांढरे, माधुरी मांढरे, हर्षद भंडारी आदी.


टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 25 एप्रिल ते 2 मे 2025
KESARI CHAPTER 2 10:15 AM | 03:00 PM 07:30 PM | 10:00 PM
JAAT 08:30 AM | 04:30 PM
UNTIL DAWN 12:45 PM | 05:30 PM
PHULE 11:30 AM | 07:20 PM
ZAPUK ZUPUK (Marathi) 12:30 PM | 06:15 PM
ANDAZ APNA APNA 09:30 AM | 03:15 PM 07:00 PM
DEVMANUS 02:00 PM | 09:00 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे नेप्ती येथील लोकांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ६९ / २ब / १ चे क्षेत्र १ –२० आर पैकी १.१२०० व ६९ / २ब / २ चे क्षेत्र ३ हे ८१ आर पैकी ३ हे ६५ आर या मिळकतीमध्ये आमचे अशिल विमल मधुकर गाडीलकर व इतर यांचा कायद्याप्रमाणे हिस्सा आहे. सदर मिळकतीमध्ये हिस्सा मिळणेकामी अहमदनगर येथील न्यायालयात रे.मु.नं. ६६८ / २०२४ चा दावा दाखल केलेला असुन त्याचे कामकाज प्रलंबित आहे. इतकेच नव्हेतर सदर मिळकतीबाबत झालेले खरेदीखत हे आमचे अशिलावर बंधनकारक नाही अशा आशयाचा देखील दावा दाखल केलेला आहे, परंतु ७/१२ पत्रकी असलेल्या नावाचा गैरफायदा घेवुन सुवर्णा शेटीया, नवीना बांठिया, दिपक शेटीया, महावीर शेटीया, ज्योती बाफना, सुमनबाई शेटीया, अभय शेटीया हे वर नमुद मिळकत तिऱ्हाईत इसमास खरेदी विक्री करु पाहत आहेत व तशा जोरदार हालचाली सुरु केलेल्या आहेत. अशा परीस्थितीत कोणीही वर नमुद मिळकतीबाबत खरेदी विक्री अथवा अन्य हस्तांतरणाचा व्यवहार करु नये, याउपरही तसे झाल्यास त्यांना कोणतीही मालकी व ताबा प्राप्त होणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. कळावे.

ता. २८/०४/२०२५
अहमदनगर

३८७६, काकडे सदन,
नांगरे गल्ली अहमदनगर
मो. नं. ९४२२३३३३३९

**सौरभ सुभाष काकडे**
बी. एस. एल. एल.एल.बी.
ॲडव्होकेट


Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 25 APRIL - 30 APRIL 2025
केसरी 2 09.00AM | 11.45AM 05.00PM | 05.45PM 07.45 PM | 10.45PM
झापुक झुपुक 12.15PM 03.00PM 05.30PM
जाट 09.15AM 02.15PM 10.30PM
अंदाज अपना अपना 02.40PM 08.15PM
देवमाणूस 12.15PM 08.15PM
छावा 09.30AM 11.00PM
Box Office | bookmyshow
Cinélife MINIPLEX
9881300400, 0241-2346000


## जाहीर नोटीस हरकत

तमाम लोकास विशेषतः रविना रविंद्र लोंढे व रविंद्र भालचंद्र लोंढे, रा. गुलाबसिंग कंपाऊड, पाटील हॉस्पिटल जवळ, स्टेशन रोड, अ.नगर यांना या हरकत नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकत ही आमचे अशिल नामे अरूण भालचंद्र लोंढे, विलास भालचंद्र लोंढे, सुहास भालचंद्र लोंढे, तसेच तुम्हापैकी रविंद्र भालचंद्र लोंढे यांची वडीलोपार्जीत अविभक्त हिस्याची मिळकत आहे. सदर मिळकतीचे अद्याप पावेतो कोणत्याही प्रकारे सरस निरस मानाने वाटप झालेले नसून दिशा ठरलेल्या नाहीत. असे असताना तुम्हापैकी रविंद्र भालचंद्र लोंढे यांनी रविना रविंद्र लोंढे यांना बेकायदेशीर बक्षीसपत्र दस्त लिहून नोंदवून दिला व सदर बेकायदेशीर बक्षीसपत्र दस्ताचे आधारे तुम्हा पैकी नं. १ रविना रविंद्र लोंढे या सदर मिळकत त्रयस्तास विक्री करण्याच्या विचारात आहेत. त्याबाबत तुम्ही नुकतीच दैनिक वृत्तपत्रात ॲड. मोसिन इलियास शेख यांचे मार्फत जाहिर नोटीस प्रसिध्द करून हरकती मागविल्या आहेत. सदर नोटीसला हरकत असल्यामुळे सदरची हरकत नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

तरी तमाम लोकांना या जाहिर नोटीसी द्वारे कळविण्यात येत आहे की, खाली परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार रविना रविंद्र लोंढे रा. गुलाबसिंग कंपाऊड, पाटील हॉस्पिटल जवळ, स्टेशन रोड, अ.नगर यांचे बरोबर करू नये. या उपरही सदर हरकत नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर कोणीही कोणताही व्यवहार खाली परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीबाबत केल्यास सदर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याचे परिणामांची सर्वस्वी जबाबदारी त्यांचेवरच राहील. मुद्दामहून कोणाचीही फसवणूक होवु नये म्हणुन सदरचे हरकत नोटीस प्रसिध्दीस दिली आहे. याची कृपया तमाम नागरीकांनी नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – डि ।। अहिल्यानगर सब डी ।। तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील शहर अहिल्यानगर येथील सि.स.नं. ७४४२ चे क्षेत्र ६९४३.०० चौ.मी. यापैकी ४३.९५ चौ.मी. जागा व त्यावरील तळमजल्यावरील लोडबेरींग बांधकाम क्षेत्र ४७.८२५ चौ. मी. असून यात ४ रुम व पहिल्या मजल्यावरील ३ रुम व संडास, बाथरूमसह तसेच यातील इलेक्ट्रीक लाईट मीटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह अशी संपूर्ण मिळकतीबाबत. यांसी चतुः सिमा पुर्वेस : सार्वजनीक रस्ता, दक्षिणेस : सि.स.नं. ७४४२ पैकी, पश्चिमेस : अंतर्गत रस्ता (बोळ), उत्तरेस : अंतर्गत रस्ता (बोळ). येणेप्रमाणे चतुः सिमा पुर्वक मिळकती त्यातील तदंगभुत हक्कासह काहीही एक राखून न ठेविता.

अहमदनगर
ता. २८/०४/२०२५

**ॲड. शुभम रमेशराव साके पाटील**
ऑफिस :– २१२ ॲडव्होकेटस् चेंबर्स,
जुने जिल्हा न्यायालय आवार, अहमदनगर.
मोबा. नं. ९६९८३०७३०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, आमच्या आशिलाने दिलेल्या माहितीवरुन व दिलेल्या कागदपत्रावरुन या नोटीसीने कळविण्यात येते की, परिशिष्ट १अ व १ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबत आमचे आशिल १. रोहीणी अविनाश चव्हाण २ . प्रेरणा अविनाश चव्हाण दोघी रा. वाळकी ता.जि.अहमदनगर यांनी मा.अहमदनगर येथील सिव्हिल जज्ञ साहेब सि डि यांचे कोर्टात स्पे.मु. नं. १४४/२०२४ चा रामलाल यादवराव चव्हाण व इतर ६ यांचे विरुध्द वाटप, कब्जा तसेच रामलाल यादव यांनी दि.०१.०३.२०२३ रोजी बक्षीसपत्र दस्त क्र.५४९०/२०२४ मौजे हडपसर येथील मिळकतीचे केले ते आमचे आशिलावर बंधनकारक नाही. तसेच परिशिष्ट मधील मिळकतीमध्ये आमचे आशिलाचा हिस्सा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळावा व मिळकतींचा प्रत्यक्ष कब्जा मिळेपावतो प्रतिवादी नं. १ ते ३ कडुन मिळकत वापरापोटी आमचे आशिलांना दरमहा रु.५०,०००/– मिळावेत असा दावा केला, दरम्यानचे काळात परिशिष्ट १अ व १ब मधील मिळकतीमध्ये कोणत्याही त्रयस्त इसमांनी व प्रतिवादी यांनी खरेदी, बक्षीस, दान, भाडेपट्टा व मृत्युपत्र इत्यादी हस्तांतराचे व्यवहार करु नये यासाठी आमचे आशिलाने सदर दाव्यामध्ये नि.५ चा अर्ज दिला. सदर अर्जाचा गुणदोषावर दि.०५.०४.२०२५ रोजी निकाल होऊन मे.कोर्टाने सदर दाव्याचा निकाल लागेपावेतो मनाई हुकुम दिलेला आहे व अर्ज मंजुर केलेला आहे. त्याचप्रमाणे आमचे आशिल यांनी सदरचे दाव्याबाबत लिज पेंडन्सीची टीपी ॲक्ट कलम ५२ प्रमाणे नोटीस दस्त क्र.१४५८/२०२५ दि.१८.०२.२०२५ रोजी प्रमाणे रजिस्टर केली आहे. तरी परिशिष्ट १अ व १ब या मिळकतीशी कोणीही कोणत्याही स्वरुपाचा वरीलप्रमाणे व्यवहार करु नये व व्यवहार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल व मे. कोर्टाच्या हुकुमाचा अवमान होईल असे कृत्य करु नये व व्यवहार केल्यास आमचे आशिलाकडुन कोणताही मालकी हक्क व त्यांचे हिश्येस असलेला कब्जा मिळणार नाही.

कळावे ही नोटीस.

**परिशिष्ट १अ)** डिस्ट्रीक्ट अहमदनगर सब डिस्ट्रीक्ट ता. नगर पैकी मौजे वाळुंज शिवारातील शेतजमीन मिळकत खालील वर्णनाची असे.

गट नंबर ३२१/१, हे.आर. ६–०५ पो.ख. ०–२३ एकुण ०–४६ आकार १०–९७ रु.पै.

वरील मिळकतीपैकी रामलाल चव्हाण यांचे नावे असलेले क्षेत्र ४३ आर व अशोक रामलाल यादव यांचे नावे असलेले क्षेत्र ४२ आर. यांसी चतुसिमा पुर्वेस – शिव, दक्षिण– गट नं. ३२०, ३१७, ३१८, ३१६, पश्चिम– शिव, उत्तर–शिव येणेप्रमाणे चतुसिमापुर्वक मिळकत त्यामधील तदंगभुत वस्तुसहीत काही एक राखुन न ठेवता.

**परिशिष्ट १)** डिस्ट्रीक्ट पुणे सब डिस्ट्रीक्ट ता. हवेली पैकी मौजे हडपसर येथील बिगरशेती मिळकती खालील वर्णनाची असे.

| अ.नं. | गट नंबर | हे. आर | रु. पै. |
|---|---|---|---|
| १) | १४९/१०/११अ/१अ/१अ/३ | ०.०१ | ०.१५ |
| २) | १४९/१०/११अ/१अ/१अ/४ | ०.०१.५० | ०.२० |

**यांसी एकत्रित चतुसिमा :** पुर्वेस – संभाजी महादेव भोसले यांची मिळकत व स.नं.१४९ पैकी
दक्षिण– १० फुटी रस्ता व त्यापलीकडे वामन रायकर यांची मिळकत
पश्चिम–राज रस्ता, उत्तर–सहादु दळवी यांची मिळकत..

येणेप्रमाणे चतुसिमापुर्वक मिळकत त्यामधील तदंगभुत वस्तुसहीत काही एक राखुन न ठेवता. सदर मिळकतीमध्ये तळमजल्यावर आठ रुम्स व २बीएचके सदनिका तसेच पहिला मजला १ रुम, सामाईक जिना असे बांधकाम, बांधकामाचे क्षेत्र १५४.०३ चौ. मी. अधिक ४४.३० चौ. मी. मिळकत.

ता.२८.०४.२०२५
अहमदनगर

**ॲड. सुविद्या श्रीपाद तांबोळी,**
नोटरी पब्लीक
रा.५०९८, बारातोटी कारंजा जवळ,
माळीवाडा, अहमदनगर. मो.९२७००४६८४६

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अर्थजगत

# मागील वर्षांचे आयकर विवरण भरता येते का?

**कलम १३९(४) नुसार तुम्ही मागील आर्थिक वर्षासाठी आयकर विवरण भरू शकता. मात्र, यामध्ये केवळ एकच मूल्यांकन वर्ष मागे जाता येते. उदाहरणार्थ, तुम्ही आर्थिक वर्ष २०२३-२४ (मूल्यांकन वर्ष २०२४-२५) चे विवरण ३१ जुलै २०२४ पूर्वी भरले नसेल, तरीही ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत भरता येते. मात्र, त्याही मागील वर्षांचे आयटीआर भरता येणार नाहीत. अशा विलंबित विवरणावर विलंब शुल्क लागू होते आणि कोणतीही कर सवलतीही मिळत नाहीत.**

पण मग त्याही मागील वर्षांमधील आयटीआर भरण्यासाठी कोणता पर्याय आहे? यासाठी आयटीआर-यू (सुधारित विवरण फॉर्म) अस्तित्वात आहे. २०२२ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला. आयटीआर-यूद्वारे तुम्ही मागील दोन मूल्यांकन वर्षांसाठी विवरण भरू शकता. म्हणजेच एकूण तीन वर्षांचा तपशील दुरुस्त करता येतो.

**आयटीआर-यू भरण्यापूर्वी**

- वेळेची मर्यादा: कोणत्याही मूल्यांकन वर्षाच्या शेवटून २४ महिन्यांपर्यंत सुधारित विवरण भरता येते. उदा. आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी (मूल्यांकन वर्ष २०२४-२५), सुधारित विवरण ३१ मार्च २०२७ पर्यंत भरता येईल.
- जर आयटीआर मुदत संपल्यानंतर १२ महिन्यांच्या आत भरले, तर मूळ कररकमेवर २५ टक्के अतिरिक्त कर व व्याज भरावा लागतो.
- जर १२ ते २४ महिन्यांमध्ये भरला तर ५०% अतिरिक्त कर व व्याज आकारले जाते.




**कसे भरायचे विवरण?**

- ही प्रक्रिया नियमित विवरणासारखीच आहे, पण काही विशेष टप्पे आहेत:
- आयकर ई-फायलींग पोर्टलवर लॉगिन करा. खाते नसल्यास प्रथम नोंदणी करा.
- योग्य मूल्यांकन वर्ष निवडा, ज्या आर्थिक वर्षासाठी विवरण भरायचं आहे, त्याचं मूल्यांकन वर्ष (एक वर्ष पुढे) निवडा.
- फॉर्म्स विभागात जाऊन आयटीआर-यू (सुधारित विवरण फॉर्म) निवडा.

त्यासोबतच तुम्ही भरत असलेला फॉर्म प्रकार (आयटीआर१ ते आयटीआर ७)देखील निवडा.

- जर तुम्ही नोकरदार असाल, तर तुमच्याकडे असलेला फॉर्म क्रमांक १६ वापरा. त्यामध्ये दिलेले उत्पन्न, टीडीएस आणि इतर बाबी भरा.
- कलम ८०सी, ८०डी इत्यादी अंतर्गत वजावट घेणे विसरू नका.
- तुमच्या फॉर्म १६ मधील तपशील 'फॉर्म २६एएस' (कर खात्याची अधिकृत माहिती) याच्याशी जुळत आहेत की नाही, याची खात्री करा.
- कलम २३४एफ अंतर्गत विलंब शुल्क आकारले जाईल. या शुल्कामध्ये तुमच्या कररकमेवरील व्याज, उशिराचा दंड आणि इतर प्रभारांचा समावेश असेल. एकूण रक्कम भरून सबमिट करा.
- विवरण भरल्यानंतर तुम्हाला ॲकनॉलेजमेंट नंबर मिळेल. त्यानंतर, ते सत्यापित करणे आवश्यक आहे. सत्यापनासाठी आधार ओटीपी, बँक खाते यापैकी कोणताही पर्याय वापरू शकता. प्रमाणीकरण किंवा आयटीआर-व्ही सही करून सीपीसी, बेंगळुरू येथे पाठवणे.

थोडक्यात मागील वर्षांचे विवरण भरून तुम्ही केवळ दंड आणि व्याज टाळत नाही, तर तुमचे आर्थिक आरोग्य सुरक्षित राखले जाते. जास्त भरलेला कर परत मिळू शकतो, चुकलेले तपशील सुधारता येतात आणि सरकारी कागदपत्रांमध्ये तुमचा नियमित सहभाग दाखवता येतो.

## आयटीआर-यू कधी स्वीकारले जात नाही?

- कलम १३९(८अ) नुसार काही प्रकरणांमध्ये आयटीआर-यू स्वीकारले जात नाही
- जर त्या वर्षाचे विवरण आधीच कर विभागाकडून तपासले गेले असेल
- जर तुम्ही शून्य विवरणपत्र दाखल करत असाल
- जर तुम्ही करदायित्व कमी करण्याचा किंवा परतावा वाढवण्याचा प्रयत्न करत असाल
- त्या मूल्यांकन वर्षात झडती किंवा जप्ती कारवाई झाली असेल
- करचुकवेगिरीसंदर्भात गुन्हा दाखल झाला असेल
- दोन वर्षांपेक्षा जास्त काळ विवरण न भरल्यास विलंब शुल्क ₹५,००० ते ₹१०,००० पर्यंत असू शकते. तसेच कर भरणे बाकी असेल, तर कलम २३४ए, २३४बी आणि २३४सी अंतर्गत व्याज भरावे लागेल. तसेच त्या वर्षासाठी जर तुमच्याकडे काही परतावा किंवा रिफंड मिळण्यासारखा असेल, तरी आता तो मिळणार नाही.
- सातत्याने विवरण न भरल्यास कर विभाग तुमच्या खात्यावर लक्ष ठेवू शकतो. नोटिसा पाठवू शकतो. मोठ्या रकमेचा कर थकवला असेल आणि विवरण वारंवार टाळले असेल, तर कलम २७६ सीसी अंतर्गत शिक्षा होऊ शकते.

# प्रवास करताना सोनं घेऊन जाताय?

*सुट्टीच्या हंगामात अनेक जण देशांतर्गत तसेच परदेशात प्रवासाला जातात. काही प्रवासी प्रवासादरम्यान जवळ सोने बाळगतात किंवा परतताना स्वतःसाठी किंवा इतरांसाठी सोन्याची खरेदी करतात. मात्र, विमान प्रवासात सोने नेण्यासंबंधी काही विशिष्ट नियम असतात, जे प्रत्येक प्रवाशाने जाणून घेणे आवश्यक आहे.*



बहुतेकांचा पहिला प्रश्न असतो विमानप्रवासात सोने नेता येते का? याचे उत्तर आहे, हो, मात्र ते ठरावीक मर्यादेतच. प्रवास देशांतर्गत आहे की आंतरराष्ट्रीय, कोणती विमानसेवा आहे आणि संबंधित देशांचे कायदे काय आहेत, यावर या नियमांची अंमलबजावणी ठरते.

**भारतात माल आयात आणि निर्यातीचे नियंत्रण कोण करते?**

भारतीय सीमाशुल्क कायदा, १९६२ नुसार भारतात सोन्यासारख्या मालाच्या आयात-निर्यातीचे नियमन केले जाते. या संदर्भातील सर्व शुल्क, अंमलबजावणी आणि वस्तू व सेवा कर यावर केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमा शुल्क मंडळ देखरेख करते.

**प्रवासात सोने जाहीर करणे बंधनकारक आहे का?**

भारतीय सोन्याचे दागिने परवानगीच्या मर्यादेत असल्यास त्यावर सीमा शुल्क लागत नाही. परंतु, जर आपल्याकडे त्या मर्यादेपेक्षा जास्त सोनं असेल, तर ते प्रस्थान करण्यापूर्वी किंवा आगमनावेळी जाहीर करणे आवश्यक असते.

जर आपल्याकडे परदेशी सोने असेल आणि ते शुल्कमुक्त मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर ते 'रेड चॅनेल' मधून जाऊन जाहीर करावे लागते आणि लागणारे शुल्क भरावे लागते. विशेषतः अलीकडे खरेदी केलेले सोने असेल, तर बिल किंवा खरेदीचा पुरावा बरोबर ठेवणे आवश्यक आहे.

**आंतरराष्ट्रीय प्रवासात किती सोने नेता येते?**

पासपोर्ट कायदा, १९६७ नुसार भारतीय प्रवाशांना १ किलोपर्यंत सोने (सोने, बार, नाणे) आयात करता येते. मात्र यासाठी संबंधित शुल्क भरावे लागते. शुल्कमुक्त मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत:

- पुरुष प्रवासी: २० ग्रॅमपर्यंत, मूल्य रु. ५०,००० पर्यंत
- महिला प्रवासी: ४० ग्रॅमपर्यंत, मूल्य रु. १,००,००० पर्यंत
- १२ वर्षांखालील मुले: रु. २५,००० पर्यंतचे सोने

**अंगावर घातलेले दागिनेही गणले जातात का?**

बॅगेज नियम २०१६ मधील नियम ३ नुसार, प्रवासादरम्यान परिधान केलेल्या वस्तूंना 'पर्सनल इफेक्ट्स' (वैयक्तिक वस्तू) म्हणून वगळण्यात आले आहे आणि त्यावर सीमा शुल्क लागत नाही. मात्र यामध्ये अंगावर घातलेले सोनं स्पष्टपणे नमूद केलेले नाही, म्हणून अधिकाऱ्यांनी विचारणा केल्यास आपण पुरावा देण्यास तयार राहावे लागते. महागडे दागिने परिधान केले असल्यास, बिल सोबत ठेवल्यास गैरसोय टळते.

**देशांतर्गत विमानप्रवासात किती सोने नेता येते?**


भारतातील अंतर्गत प्रवासासाठी किती सोने न्यावे यासाठी कोणतीही अधिकृत मर्यादा नाही. मात्र, आपण जर खूप जास्त प्रमाणात सोने घेऊन प्रवास करत असाल, तर एअरपोर्ट सुरक्षा किंवा आयकर विभाग आपली चौकशी करू शकतो. अशा वेळी, संबंधित खरेदीची पावती/बिल दाखवणे आवश्यक ठरते. हे सोने कायदेशीररीत्या विकत घेतले आहे हे सिद्ध झाले पाहिजे, अन्यथा ते काळ्या पैशाशी संबंधित असल्याचा संशय येऊ शकतो.

- या पार्श्वभूमीवर काही गोष्टी लक्षात ठेवा
- प्रवास देशांतर्गत असो किंवा आंतरराष्ट्रीय, सोन्याचे वा दागिन्यांचे अधिकृत बिल नेहमी सोबत ठेवा
- सोने परदेशातून आणत असाल, तर शुल्कमुक्त मर्यादा लक्षात ठेवा
- शंका असल्यास रेड चॅनलमधून सोने जाहीर करा
- तपासणीत सहकार्य करा, गैरकायदेशीर वाटू शकणारी कोणतीही गोष्ट टाळा
- सोने घेऊन प्रवास करताना योग्य नियमांची माहिती असणे आणि अधिकाऱ्यांसोबत सहकार्य करणे, यामुळे तुमचा प्रवास त्रासमुक्त व सुखकर होतो. कोणताही संशय निर्माण होण्याआधीच स्पष्टीकरणास तयार राहा, हीच सुरक्षिततेची गुरुकिल्ली आहे.

# रिफंड कमी मिळणार?

*जर तुम्हाला यंदा अपेक्षेपेक्षा कमी आयकर परतावा मिळाला, तर आश्चर्य वाटून घेऊ नका. कारण आयकर विभागाने जुन्या वर्षातील थकबाकीचा समायोजन करण्याचा निर्णय घेतला असून, तो थेट तुमच्या सध्याच्या परताव्यावर परिणाम करू शकतो.*

मार्च २०२५ मध्ये अनेक करदात्यांना आयकर विभागाकडून ईमेलद्वारे कळवण्यात आलं की, त्यांच्या काही मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकन प्रक्रिया प्रलंबित आहेत आणि म्हणूनच त्यांचा परतावा रोखण्यात येत आहे. हा निर्णय आयकर कायद्यातील कलम २४५ (२) अंतर्गत घेतला जात आहे. हे कलम आयकर विभागाला सध्याच्या परताव्याच्या रकमेचा उपयोग जुनी कर थकबाकी वसूल करण्यासाठी करण्याचा अधिकार देते. आणि




या कलमासाठी कोणतीही कालमर्यादा नाही.

**कायदेशीर प्रक्रिया कशी सुरू होते?**

- सेंट्रलाईज्ड प्रोसेसिंग सेंटरमध्ये परताव्याच्या विनंतीवर विश्लेषण होते.
- थकबाकीची शक्यता वाटली, तर हे प्रकरण ज्युरिडिक्शनल असेसिंग ऑफिसरकडे (जेएओ)पाठवले जाते. तिथे प्रकरण तपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून परवानगी घेऊन निर्णय सीपीसीला कळवला जातो. ही संपूर्ण प्रक्रिया ५० दिवसांत पूर्ण होणे आवश्यक आहे.
- तुमच्याकडे पूर्वीच्या वर्षांमध्ये थकबाकी असेल, तर आयकर विभाग तुमचा सध्याचा परतावा त्यात समायोजित करू शकतो.
- तुम्हाला २१ दिवसांचा वेळ दिला जातो. या काळात थकबाकीबाबत तुमचे म्हणणे विभागाला सादर करू शकता.
- जर तुम्हाला अशी नोटीस आली, तर काय कराल?
- ई-फायलिंग पोर्टलवर लॉगइन करा आणि संबंधित विभागात उत्तर द्या.
- जर थकबाकी चुकीची असेल, तर तुमचे म्हणणे स्पष्ट करा आणि समर्थनार्थ पुरावे जोडावेत.
- उदा. थकबाकी आधीच भरलेली आहे, अपील प्रलंबित आहे / स्टे मिळालेला आहे, चुका दुरुस्तीसाठी अर्ज सादर केलेला आहे इत्यादी.
- तुमच्या उत्तराच्या आधारे अंतिम निर्णय सीपीसीकडे पाठवतो.

**जर विभागाने चुकीचा समायोजन केलं, तर...?**

तुम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज करू शकता. तरीही उपाय न झाल्यास, घटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा अधिकार तुम्हाला आहे. सरकारचा उद्देश कर सवलतीमध्ये पारदर्शकता आणण्याचा आहे, पण करदात्यांनीही सतर्क राहण्याची गरज आहे. प्रत्येक ईमेल, नोटीस यांचे बारकाईने निरीक्षण करणे, वेळेत उत्तर देणे आणि आपल्या हक्कांसाठी योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. परतावा हा तुमचा अधिकार आहे; पण जुने हिशेब चुकले, तर त्याचा परिणाम तुमच्या हक्कावरही होऊ शकतो, हे विसरू नका.




# ग्रुप हेल्थ पॉलिसीवरून वैयक्तिक आरोग्य विम्यावर पोर्टिंग कसे करावे?

कंपनीकडून मिळणाऱ्या ग्रुप हेल्थ इन्शुरन्समधून बाहेर पडून स्वतःच्या नावावर वैयक्तिक आरोग्य पॉलिसी घ्यायची असेल, तर पोर्टिंग किंवा स्थानांतरण हा पर्याय खूपच उपयुक्त आहे. यात आधीच्या पॉलिसीतील वेटिंग पिरीयडसारखे लाभ टिकवून ठेवता येतात. ही प्रक्रिया कशी करायची?

१. **पोर्टिंगची पूर्वसूचना द्या** : विमा पॉलिसी संपण्याच्या ४५-६० दिवस आधी विमा कंपनीला लेखी अर्ज करून कळवा की तुम्हाला ग्रुप पॉलिसी वैयक्तिक पॉलिसीमध्ये पोर्ट करायची आहे.

२. **फॉर्म भरणे** : विमा कंपनीकडून पोर्टेबिलिटी फॉर्म आणि प्रपोजल फॉर्म दिले जातील. यात वैयक्तिक माहिती, जुन्या पॉलिसीचा तपशील आणि क्लेम इतिहास विचारला जातो. हे फॉर्म काळजीपूर्वक व अचूक भरावेत.

३. **आवश्यक कागदपत्रे जमा करा** : ओळखपत्र आणि पत्ता पुरावा, विद्यमान पॉलिसीचा तपशील, वैद्यकीय इतिहास ही माहिती विमा कंपनीला जोखीम समजून घेण्यासाठी आणि लाभ सतत चालू ठेवण्यासाठी लागते.

४. **अंडररायटिंग प्रक्रिया** : विमा कंपनी तुमचा अर्ज, आरोग्यविषयक माहिती आणि पूर्वीचे क्लेम तपासते. काही वेळा वैद्यकीय तपासणीसाठी बोलावलं जाऊ शकतं. यावरून ठरतं की वैयक्तिक पॉलिसी पूर्वीच्या अटींवरच दिली जाईल की नाही.


५. **नवीन पॉलिसीचा विमा जारी** : सर्व काही मंजूर झाल्यावर वैयक्तिक आरोग्य पॉलिसी जारी होते. ग्रुप पॉलिसीतील वेटिंग पिरीयडचा सातत्य राखलं जातं. त्यानंतर तुम्हाला ठरलेला प्रीमियम भरावा लागतो.

**महत्वाच्या गोष्टी लक्षात ठेवा:**
नवीन पॉलिसीचे नियम, अटी नीट वाचा. जुनी पॉलिसीतील लाभ (उदा. वेटिंग पिरीयड, क्लेम हिस्ट्री) योग्य प्रकारे पोर्ट झाले आहेत की नाही, याची खात्री करा.

# यूपीआय सर्कलच्या अंतरंगात

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या भीम सर्व्हिसेसने २३ एप्रिल २०२५ रोजी भीम ॲपवर णझख सर्कल नावाची नवीन सुविधा सुरू केली आहे. या फीचरद्वारे तुम्ही तुमच्या युपीआय खात्यातून ५ विश्वासू व्यक्तींना (दुय्यम युजर्स) पैसे पाठवण्याची परवानगी देऊ शकता. पण, प्रत्येक व्यवहाराला तुमची (प्राथमिक युजर) भीम ॲपवर त्वरित मंजुरी आवश्यक आहे. ही सुविधा डिजिटल पेमेंटला सुलभ आणि सुरक्षित बनवते, विशेषतः जे लोक तांत्रिक अडचणींमुळे किंवा संकोचामुळे डिजिटल पेमेंट करत नाहीत त्यांच्यासाठी.

**युपीआय सर्कल म्हणजे काय?**




युपीआय सर्कलद्वारे तुम्ही तुमच्या विश्वासू व्यक्तींना दुय्यम युजर म्हणून जोडू शकता. हे दुय्यम युजर भीम ॲपद्वारे तुमच्या खात्यातून पेमेंट सुरू करू शकतात, पण पेमेंट पूर्ण होण्यासाठी तुम्ही णझख पिन टाकून मंजुरी द्यावी लागेल. एनपीसीआयच्या मुख्य कार्यकारी अधिकारी ललिता नटराज म्हणाल्या, युपीआय सर्कल पैसे पाठवणे आणि व्यवस्थापन अधिक सोपे करते आणि समाजाला जोडण्यास मदत करते.

**कोणाला होईल फायदा?**

ज्येष्ठ नागरिक: कुटुंबातील सदस्य त्यांना दुय्यम युजर बनवू शकतात. त्यांनी सुरू केलेले पेमेंट तुम्ही त्वरित मंजूर करू शकता. पालक आणि मुले: मुलांना मर्यादित पेमेंटची परवानगी देऊन अभ्यास किंवा खर्चासाठी पेमेंट सोपे आणि सुरक्षित होईल.

व्यवसायिक: कर्मचाऱ्यांना पेट्रोल, टोल किंवा व्हेंडर पेमेंटसाठी मर्यादित परवानगी देऊन खर्चावर रिअल-टाइम नियंत्रण ठेवता येते. नोकरदार: अवलंबितांना डिजिटल पेमेंटची सुविधा देता येते, प्रत्येक व्यवहारावर लक्ष ठेवून.

**युपीआय सर्कल कसे वापरावे?**

भीम ॲप उघडा आणि युपीआय सर्कल सेक्शनवर जा. ॲड सेकंडरी युजरवर क्लिक करा आणि युपीआय आयडी टाका किंवा क्यूआर कोड स्कॅन करा. ॲप्रूव्ह एव्हरी पेमेंट हा पर्याय निवडा. दुय्यम युजरला आमंत्रण मिळेल, जे त्याने स्वीकारावे. दुय्यम युजर पेमेंट सुरू करू शकतो, पण तुमच्या मंजुरीनंतरच पेमेंट पूर्ण होईल.

**भीम ॲपच्या नव्या आवृत्तीवर उपलब्ध**

झ्युपीआय सर्कल फीचर भीम ॲपला अधिक विश्वासार्ह आणि वापरायला सोपे बनवते. हे डिजिटल पेमेंटला सुरक्षित आणि पारदर्शी बनवते. ज्येष्ठ, मुले आणि अवलंबितांसाठी ही मोठी सोय आहे, जी डिजिटल भारताच्या दिशेने महत्त्वाची आहे.

# ८०सी, ८०डी आणि ८७ए एकत्रितपणे दावा करता येतो का?

**भारतातील करदात्यांना त्यांच्या करआधारामध्ये घट करून मोठ्या प्रमाणावर करबचत करण्याची संधी असते. यासाठी आयकर अधिनियमाच्या कलम ८०सी, ८०डी आणि ८७ए अंतर्गत सूट आणि सवलतींचा लाभ घेता येतो. अनेकांना प्रश्न पडतो की, ८०सी व ८०डी अंतर्गत एकत्रित सूट घेतल्यावर ८७ए अंतर्गत सवलतही मिळू शकते का? याचे उत्तर होय आहे. ठराविक अटी पूर्ण झाल्यास तुम्ही या तिन्ही सुविधा एकत्रित वापरून तुमची करजबाबदारी शून्य करू शकता.**



**कलम ८०सी: गुंतवणुकीवर आधारित वजावट**

कलम ८०सी अंतर्गत वार्षिक ₹१.५ लाखांपर्यंतची सूट मिळू शकते. ही करवजावट सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी भविष्य निधी, नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट, जीवन विमा हप्ते (स्वतः, जोडीदार व मुलांसाठी) करबचत मुदतठेवी (५ वर्षे लॉक-इन), गृहकर्जाचे मूळ परतफेड, मुलांचे शिक्षण शुल्क यातील कोणतीही किंवा एकापेक्षा जास्त गुंतवणूक एकत्रित करून ₹१.५ लाखांपर्यंत सूट घेता येते.

**कलम ८०डी: आरोग्य विम्यावरील सूट**

८०डी अंतर्गत आरोग्य विम्यासाठी भरलेले हप्ते व त्यावर आधारित सूट दिली जाते. स्वतः, जोडीदार आणि मुलांसाठी विमा हप्ता भरल्यास: ₹२५,००० पर्यंत सूट मिळते; तर पालकांसाठी विमा हप्ता भरल्यास ₹२५,००० पर्यंत (६० वर्षांखालील) सवलत मिळते. ज्येष्ठ नागरिकांसाठी (६० वर्षांवरील) ₹५०,००० पर्यंत सूट मिळू शकते. ८०सी आणि ८०डीमधील सवलती एकत्रितपणे घेता येतात.

**कलम ८७ ए: करसवलत**

कलम ८७अ अंतर्गत भारत सरकारने करदात्यांना त्यांच्या करदायित्वातून थेट सवलत देण्याची तरतूद केली आहे. ही सवलत करकपात नसून कर सवलत आहे. म्हणजेच ह्या सवलतीमुळे थेट तुमचं एकूण कर रक्मेत घट होते. ही करसवलत फक्त निवासी व्यक्तींनाच लागू होते. यामध्ये दोन करप्रणालीनुसार सवलतीचे नियम बदलतात:

**जुनी करप्रणाली. आर्थिक वर्ष २०२५-२६:** एकूण करपात्र उत्पन्न (८०सी, ८०डी नंतर) ₹५ लाखांपेक्षा कमी असल्यास ₹१२,५०० पर्यंत सवलत मिळू शकते. म्हणजेच, तुमचे उत्पन्न ₹५ लाखांखाली गेले, तर तुमची करजबाबदारी पूर्णपणे शून्य होते.

नवीन करप्रणालीमध्ये एकूण करपात्र उत्पन्न ₹१२ लाखांपेक्षा कमी असल्यास ₹२५,००० पर्यंत सवलत. मात्र लक्षात घ्या, नवीन करप्रणालीत ८०सी व ८०डीसारख्या सूट लागू होत नाहीत.

उदाहरणार्थ, एका व्यक्तीचे एकूण उत्पन्न ५.७५ लाख रुपये असेल. त्याने ८०सी अंतर्गत वजावट १.५ लाखाची असेल आणि ८०डी अंतर्गत वजावट २५,००० रुपये असेल, तर सदर व्यक्तीचे करपात्र उत्पन्न ५.७५ लाख - १.५ लाख - २५,००० असे ४ लाख रुपये असेल. यामध्ये ८७ए अंतर्गत (जुनी करप्रणाली) १२,५०० सवलत घेतल्यास अंतिम करजबाबदारी शून्य रुपये येईल.

लक्षात ठेवा. ८७एची सवलत फक्त निवासी व्यक्तींनाच लागू होते. तसेच ही सवलत फक्त कराशीवर लागू होते, उत्पन्नावर नाही. ही सवलत दीर्घकालीन भांडवली नफ्यावर (११२अ अंतर्गत) लागू होत नाही. नवीन करप्रणालीत ८०सी व ८०डी लागू होत नाहीत. त्यामुळे सवलत मिळवण्यासाठी उत्पन्न मर्यादेचा थेट विचार करावा लागतो.

थोडक्यात, ८०सी व ८०डीमुळे करपात्र उत्पन्न घटते, तर ८७एमुळे थेट कराशी कमी होते. या तीन कलमांचा योग्य वापर केल्यास तुम्ही केवळ गुंतवणूक व विमा संरक्षण नव्हे, तर शून्य करजबाबदारी मिळवू शकता. मात्र कोणती करप्रणाली निवडायची हे समजून घेतले पाहिजे.

